रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक २३
www.ramprahar.com
◆ रविवार, ९ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

सीकेटीत 'गुड टच, बॅड टच'बाबत मार्गदर्शन/३
`आदिवासी समाजाची वास्तू चालती बोलती असावी'/६
महारोजगार मेळाव्याची चित्रमय झलक/८

## 'मिसिंग लिंक'वर वेगाला लगाम; ओव्हरस्पीड कॅमेरे बसवणार




**मुंबई :** पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील नव्या 'मिसिंग लिंक'वर वाढणाऱ्या अतिवेगाच्या अपघातांनंतर आता बेशिस्त वाहनचालकांवर करडी नजर ठेवली जाणार आहे. वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांना आळा घालण्यासाठी 'मिसिंग लिंक'च्या चारही बोगद्यांत लवकरच ओव्हरस्पीड कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. अवजड वाहनांना प्रवेश बंदी असतानाही होणारी घुसखोरी रोखण्यासाठी महामार्ग पोलिसांनी कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. 'मिसिंग लिंक'मुळे पुणे-मुंबई प्रवासातील अंतर व वेळ कमी झाला असला तरी या नव्या मार्गावर वाहनांचा वेग प्रचंड वाढल्याचे दिसून येते. गुरुवारी मध्यरात्री 'मिसिंग लिंक'मध्ये अतिवेगामुळेच झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

# पनवेलमध्ये महारोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

## ■ ६४ कंपन्यांचा सहभाग; २५०२ उमेदवारांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोजगाराच्या शोधात असलेल्या युवक-युवतींना थेट रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने भारतीय जनता पार्टी, पनवेलच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'महारोजगार मेळावा २०२६'ला हजारो उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शनिवारी (दि. ८) चांगू काना ठाकूर महाविद्यालय, खांदा कॉलनी येथे झालेल्या या मेळाव्यात तब्बल ६४ नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतल्याने रोजगाराच्या विविध क्षेत्रांतील संधी उमेदवारांसाठी उपलब्ध झाल्या.





भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या महारोजगार मेळाव्यात दहावी, बारावी उत्तीर्ण उमेदवारांपासून आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर, पदव्युत्तर तसेच विविध कौशल्ये असलेल्या उमेदवारांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सकाळपासूनच मेळाव्याच्या ठिकाणी युवक-युवतींची मोठी गर्दी पाहायला मिळाली. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या मेळाव्याचे उद्घाटन पनवेलचे महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते झाले.

मेळाव्यास ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक व नगरसेवक परेश ठाकूर, उपमहापौर प्रमिला पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, प्रल्हाद केणी, नगरसेवक दशरथ म्हात्रे, रवींद्र भगत, राजू सोनी, डॉ. अरुणकुमार भगत, अजय बहिरा, समीर ठाकूर, एकनाथ गायकवाड, मधू पाटील, प्रवीण पाटील, अमर पाटील, विकास घरत, नगरसेविका प्रतिभा भोईर, सीता पाटील, जिल्हा परिषद सदस्या कमला देशेकर, पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील, काशिनाथ पार्टे, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक संजय भगत, स्वप्निल ठाकूर, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, ॲड. चेतन जाधव, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, कामगार नेते जितेंद्र घरत, कामगार सेलचे जिल्हाध्यक्ष रवींद्र नाईक,



सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, भाजपचे शहर चिटणीस रुपेश नागवेकर, ओबीसी सेलचे राजेश गायकर, रामनाथ पाटील, डॉ. संतोष आगलावे, युवा मोर्चाचे नवीन पनवेल अध्यक्ष मयूर कदम, पनवेल शहर अध्यक्ष हिमेश बहिरा, चिन्मय समेळ, अक्षय सिंग, विश्वजीत पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांना आत्मनिर्भर बनवणे आणि त्यांच्या करिअरला योग्य दिशा देणे, या उद्देशाने भविष्यातही अशा उपक्रमांना प्रोत्साहन देणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी स्पष्ट केले. ६४ कंपन्यांच्या सहभागामुळे विविध उद्योग आणि रोजगार क्षेत्रांतील संधी एकाच छताखाली उपलब्ध झाल्या. यामध्ये २५०२ उमेदवारांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. कंपन्यांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांशी थेट संवाद साधत त्यांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्य आणि अनुभवाच्या आधारे विविध पदांसाठी मुलाखती घेतल्या. त्यामुळे अनेक उमेदवारांना रोजगाराच्या संधींसोबतच करिअरविषयक मार्गदर्शन आणि उद्योग क्षेत्रातील आवश्यक कौशल्यांची माहिती मिळाली.

मेळाव्यात भारत इलेक्ट्रॉनिक्स, असाही इंडिया ग्लास लिमिटेड, युनिकेअर हेल्थकेअर, इकोशाईन फॅसिलिटी सोल्युशन्स एलएलपी, आयपीएस ग्रुप्स, पटेल ज्वेलर्स प्रायव्हेट लिमिटेड, सदरलँड, लिशियस, फॉर्च्यून सिम्बॉलॉजी रिसर्च सेंटर, युवाशक्ती स्किल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, क्युअरफूड्स, एनआयआयटी फाउंडेशन, सिमरन मोटर्स, ॲक्सिस बँक, वाशी इंटिग्रेटेड सोल्युशन्स, टाटा स्ट्राइव्ह, झेप्टो, ब्लूमबे एंटरप्रायझेस, डिजिटाइड सोल्युशन्स, १ पॉइंट १, प्रशांत कॉर्नर प्रायव्हेट लिमिटेड, सोडेक्सो इंडिया सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, आर पॉवर, इंजेनिक्स, यूएम सर्व्हिसेस, एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस, एसबीआय कॅप सिक्युरिटीज, महिंद्रा इंटिग्रेटेड बिझनेस सोल्युशन्स, मुथूट फायनान्स लिमिटेड, एस. एच. केलकर, नेटटेक इंडिया, क्वेस कॉर्प लिमिटेड, टॅलीउन्नती इन्फो सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, शेट्टी इन्फ्रासर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, अरकॅश इंडिया एलएलपी, ऑटोबान ट्रकिंग कॉर्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेड, एसके ग्रुप, डीआरएस अर्थवर्क प्रायव्हेट लिमिटेड, पॅराडाइम आयटी टेक्नॉलॉजीज सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, झेनिथ्रा ग्लोबल सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड, द अक्षय पात्र फाउंडेशन, कोटक बँक लिमिटेड, मेरिट्यूड स्किल डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेड, केमस्पेक केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, आईसबर्ग इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड, व्ही-इन्शुअर फार्मा प्रायव्हेट लिमिटेड, श्री टेक्नोक्रॅट कम्युनिकेशन सिस्टिम्स प्रायव्हेट लिमिटेड (एसटीसीएस), अभिनव इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, वॉट्स व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड, अमुवा कॉर्पोरेशन, रेडविंग मॅनेजमेंट फॅसिलिटेटर्स प्रायव्हेट लिमिटेड, गार्गी हटेन्स अल्बर्टस प्रायव्हेट लिमिटेड, **(पान २...)**

### ३२३ जणांची 'ऑन द स्पॉट' निवड

महारोजगार मेळाव्यात विविध क्षेत्रांतील तब्बल ६४ नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला. विविध पदांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्याने सुमारे २५०२ उमेदवारांनी नोंदणी करून प्रत्यक्ष सहभाग नोंदविला. मुलाखतीतून १,२३७ उमेदवारांची पुढील फेरीसाठी निवड करण्यात आली, तर ३२३ उमेदवारांची जागेवरच 'ऑन द स्पॉट' निवड करण्यात आली. त्यामुळे अनेक युवक-युवतींना मेळाव्याच्या माध्यमातून थेट रोजगाराची संधी मिळाली आहे. मेळाव्याला मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक असून युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांना मुलाखतीचे प्रशिक्षण देण्याचाही प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला, अशी माहिती आयोजन समिती प्रमुख ॲड. चेतन जाधव यांनी दिली.

## निवडक

### तब्बल ५१ बालकांसोबत दुष्कृत्य करणाऱ्या नराधमाला बेड्या

**नंदुरबार :** नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात पोक्सोंतर्गत तसेच लैंगिक अत्याचारासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रायसिंगपुरा येथील २२ वर्षीय चेतन प्रकाश कोळी याला याप्रकरणी पोलिसांनी ताब्यात घेतले. संबंधित तरुणावर अल्पवयीन बालकांसह काही तरुणांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात तब्बल ५१ अल्पवयीन पीडित असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आल्याने प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे.

### खराब हवामानामुळे अमरनाथ यात्रा तात्पुरती स्थगित

**जम्मू :** खराब हवामान व पुढील काही दिवस मुसळधार पावसाच्या अंदाजामुळे अमरनाथ यात्रा शनिवारी जम्मूमधून तात्पुरती स्थगित करण्यात आली. यात्रेकरूंच्या सुरक्षेसाठी प्रशासनाने हा निर्णय घेतला असून हवामानाची स्थिती व जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गाची परिस्थिती पाहून पुढील निर्णय घेतला जाईल. त्यामुळे जम्मूमधून अमरनाथ यात्रेसाठी निघणाऱ्या भाविकांना काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे.

## अमित शाह यांचे महाराष्ट्राला 'गिफ्ट'

### राज्यात होणार राष्ट्रीय सहकारी वित्त व विकास महामंडळाचे मुख्यालय

**मुंबई : प्रतिनिधी**

अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्राला आधुनिक, पारदर्शक, विश्वासार्ह आणि तंत्रज्ञानाधिष्ठित बनविण्यासाठी 'अंब्रेला ऑर्गनायझेशन' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या माध्यमातून देशातील प्रत्येक तहसीलपर्यंत अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंगचे जाळे विस्तारण्याला मोठी चालना मिळेल, असा विश्वास केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी शनिवारी (दि. ८) व्यक्त केला. देशातील अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत त्यांनी राष्ट्रीय शहरी सहकारी वित्त व विकास महामंडळाचे मुख्यालय दिल्लीहून महाराष्ट्रात हलवण्यात येईल, अशी घोषणाही यावेळी केली.



बीएसई इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे आयोजित 'सहकार नव-क्रांती मेळावा' कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पणनमंत्री जयकुमार रावल, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त विकास महामंडळाचे अध्यक्ष ज्योतिंद्र मेहता, केंद्रीय सहकार मंत्रालयाचे सचिव डॉ. आशीष कुमार भूटानी तसेच अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

देशातील प्रत्येक अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेने, अगदी एका शाखेच्या बँकेनेही अंब्रेला ऑर्गनायझेशनचे सदस्यत्व घ्यावे. सदस्यत्व घेतल्यानंतर सुरक्षा संचालन केंद्राशी जोडले जावे. यामुळे बँकांमधील ठेवीदारांचा विश्वास वाढण्यास मदत होईल आणि बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित होईल, असे केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह म्हणाले.

अंब्रेला संस्था बँकिंग क्षेत्रात करण्यात येत असलेल्या नवीनतम सुधारणांची माहिती तसेच म्यूल हंटरसारख्या आवश्यक सॉफ्टवेअर सुविधा या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जातील. अंब्रेलाच्या मदतीने कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमही आयोजित करता येतील. स्पर्धात्मक बँकिंग क्षेत्रात इतरांच्या बरोबरीने उभे राहण्यासाठी तसेच जनता व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा विश्वास संपादनासाठी अंब्रेला मार्गदर्शक ठरणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### सहकारी बँकिंग क्षेत्रामध्ये मोठे योगदान

महाराष्ट्रात ४४९ सहकारी बँका असून देशातील सहकारी बँकिंग क्षेत्रात महाराष्ट्राचे मोठे योगदान आहे. महाराष्ट्रासह गुजरात, गोवा व कर्नाटकमध्ये देशातील मोठ्या प्रमाणावर शहरी सहकारी बँका कार्यरत आहेत. त्यामुळे शहरी सहकारी बँकिंग क्षेत्राच्या अंब्रेला संस्थेचे मुख्यालय महाराष्ट्रात असणे अधिक उपयुक्त ठरेल. देशातील शहरी सहकारी बँकांना 'अम्ब्रेला ऑर्गनायझेशन'च्या माध्यमातून एकत्र आणण्याचे उद्दिष्ट आहे, असेही अमित शाह यांनी सांगितले.

## पावसाचा 'रायगड पॅटर्न'; चेरापुंजीलाही टाकले मागे

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**



सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील ताम्हाणी घाट आणि सुधागड तालुक्यातील भिरा परिसराने यंदाच्या मान्सूनमध्ये पावसाचा नवा विक्रम नोंदवला आहे. ऑगस्ट २०२६पर्यंत ताम्हाणी येथे ७२७१ मिमी, तर भिरा येथेही तब्बल ७२७१ मिमी पावसाची नोंद झाली असून देशातील सर्वाधिक पावसाचे ठिकाण म्हणून हा परिसर अव्वल ठरल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे. अतिवृष्टीसाठी जगप्रसिद्ध असलेल्या मेघालयातील चेरापुंजी व मावसिनरामलाही ताम्हाणी-भिराने मागे टाकले आहे.

याच कालावधीत चेरापुंजी येथे २५०० मिमी, मावसिनराम येथे २८०० मिमी, सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर येथे ५,४१० मिमी, तर कर्जत तालुक्यातील माथेरान येथे ४,९५० मिमी पावसाची नोंद झाली आहे. जुलै आणि ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या धुवाँधार पावसामुळे ताम्हाणी-भिरा परिसरातील पावसाच्या नोंदींनी विक्रमी झेप घेतली आहे. अरबी समुद्राकडून येणारे दक्षिण-पश्चिम मान्सून वारे सह्याद्रीच्या उंच कड्यांवर धडकत असल्याने ताम्हाणी घाट परिसरात ओरोग्राफिक म्हणजेच डोंगराळ पावसाची तीव्रता वाढते. ताम्हाणीची भौगोलिक रचना व सभोवतालच्या उंच डोंगररांगांमुळे ढगांचा मुक्काम वाढतो.

जुलैमध्ये अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यांमुळे मान्सूनचा द्रोणीय प्रभाव उत्तर कोकण आणि घाटमाथ्यावर राहिला. जुलैच्या मध्यात ताम्हाणी-भिरा परिसरात सलग पाच दिवस दररोज ३०० मिमीपेक्षा अधिक पावसाची नोंद झाल्याने एकूण पर्जन्यमानात मोठी वाढ झाली, असे भूगोलतज्ज्ञ प्रा. डॉ. समीर बुटाला यांनी सांगितले. अभूतपूर्व पावसामुळे कोकणातील कुंडलिका, अंबा आणि सावित्री नद्यांना अनेकदा पूर आला. भिरा येथील टाटा पॉवरच्या जलविद्युत प्रकल्पाचा जलाशय पूर्ण क्षमतेने भरला आहे.

## सतत शिकत राहणे यशाची गुरुकिल्ली

### ■ पंतप्रधान नरेंद्र मोदींचा आयआयटीच्या विद्यार्थ्यांशी संवाद

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयुष्याच्या परीक्षेत सर्व काही आऊट ऑफ सिलॅबस असते, असे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. ८) आयआयटी दिल्लीच्या ५७व्या दीक्षांत समारंभात विद्यार्थ्यांना शिकण्याची जिद्द, प्रश्न विचारण्याचे धाडस आणि आव्हानांचे लहान तुकडे करण्याचा महत्त्वाचा गुरुमंत्र दिला. तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात केवळ पदवी नव्हे, तर सतत शिकत राहणेच यशाची गुरुकिल्ली असल्याचेही ते म्हणाले.

पंतप्रधानांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT) दिल्लीच्या ५७व्या दीक्षांत समारंभाला हजेरी लावली. कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते ३,०००हून अधिक विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांना संबोधित करताना मोदी म्हणाले, आज तुमच्या कुटुंबाला तुमचा अभिमान वाटत आहे, तसाच मलाही तुमचा खूप अभिमान



आहे. अनेक विद्यार्थ्यांना यशासाठी मेडल मिळाले. मी तुम्हा सर्वांचे मनापासून अभिनंदन करतो, मात्र यात आणखी काही मुली असत्या तर मला अधिक आनंद झाला असता.

जेव्हा आयुष्य तुम्हाला मागे वळून पाहण्याची संधी देईल, तेव्हा कॅम्पस लाईफ कायम आठवणीत राहील. तुमच्या प्रत्येक यशात तुम्ही येथील प्राध्यापक व वातावरणाची आठवण काढाल. त्यामुळे येथून निघताना प्रत्येक गोष्टीला एक 'ॲसेट' म्हणून सोबत घेऊन जा व या आठवणी कधीही विसरू नका. माझी सर्वांना विनंती आहे की जाताना कॅम्पसमधील प्रत्येक व्यक्तीला भेटून जा व हे नातं कायम ठेवण्याचा प्रयत्न करा. आज तुम्ही अशा काळात या संस्थेतून बाहेर पडत आहात, जेव्हा जग अतिशय वेगाने बदलत आहे आणि जगातील धोरणात्मक समीकरणेही बदलत आहेत, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

पुढच्या २० ते ३० वर्षांत जग कसे असेल, हे आज कोणीही ठामपणे सांगू शकत नाही. जेव्हा जेव्हा बदल होतो, तेव्हा आव्हानेही सोबत येतात. प्रत्येक गोष्ट बदलत आहे, व्यवसाय बदलत आहेत आणि संधीही बदलत आहेत, पण माझी एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा जो शिकेल, तोच जिंकेल. जो नवीन आव्हानांवर नवीन शोध आणि उपाय शोधण्याचे धाडस दाखवेल, त्याच्यासाठी आव्हानांचे रूपांतर संधींमध्ये होईल, असे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.

## चंबामध्ये बस अपघातात सात ठार, ११ जखमी

**चंबा : वृत्तसंस्था**

हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यात शनिवारी (दि. ८) सकाळी बैरागढ-तिस्सा मार्गावर भीषण बस अपघात झाला. बैरागढहून चंबाकडे जाणारी खासगी बस चालुंज मोरीजवळ उलटून खालच्या रस्त्यावर कोसळली. सकाळी ७.१५ वाजता झालेल्या या अपघातात किमान सात प्रवाशांचा मृत्यू झाला असून ११ जण जखमी झाले आहेत.

अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी मोठ्या प्रमाणावर बचावकार्य सुरू करण्यात आले. पोलीस, होमगार्ड, अग्निशमन दल आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. बसमध्ये अपघातावेळी सुमारे २० ते २५ प्रवासी असल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघातात जखमी झालेल्या सर्व ११ प्रवाशांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त

## प्रभाग १९मध्ये स्वच्छता अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी प्रभाग क्रमांक १९च्या माध्यमातून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शनिवारी (दि. ८) विविध सामाजिक उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत प्रभागातील विविध भागांमध्ये व्यापक स्वच्छता अभियान राबवून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला तसेच परिसराची सेवा करणाऱ्या स्वच्छतादूतांचा विशेष सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून स्वच्छतादूतांचा गौरव केला तसेच उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, या सामाजिक उपक्रमामुळे प्रभाग क्रमांक १९मध्ये स्वच्छतेविषयी अधिक जागरूकता निर्माण झाली आहे. हा सामाजिक कार्याचा वारसा असाच पुढे चालू ठेवूया, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या अभियानांतर्गत प्रभागातील लाईन आळी विभागात नगरसेविका दर्शना भोईर यांच्या नेतृत्वाखाली, मोमीन पाडा आणि रोहिदास वाडा परिसरात नगरसेवक राजू सोनी व प्रभाग अध्यक्ष पवन सोनी यांच्या नेतृत्वाखाली, तर मिडलक्लास सोसायटी परिसरात नगरसेवक तथा भाजप पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंजारराव यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वच्छता अभियानानंतर मिडलक्लास सोसायटीच्या मैदानावर सुमित झुंजारराव यांच्या पुढाकाराने वृक्षारोपण, हायमास्ट दिव्यांचे लोकार्पण आणि अहोरात्र सेवा देणाऱ्या स्वच्छतादूतांचा सन्मान करण्यात आला. **(पान २...)**

# भारताच्या भविष्यातील विकासाचे मुख्य केंद्र नवी मुंबईच -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र आणि ईशान्य भारतातील मेघालय ही केवळ दोन राज्ये नसून 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या संकल्पनेला मूर्त रूप देणारी सहोदर राज्ये आहेत, अशा शब्दांत गौरव उद्‌गार काढत महाराष्ट्र आणि मेघालय यांच्यातील सांस्कृतिक व आर्थिक नाते अधिक दृढ होत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. खारघर येथे आयोजित 'मेघालय सदन' च्या जमीन हस्तांतरण व भूमिपूजन सोहळ्यात मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते. नवी मुंबई, ठाणे आणि रायगड हा संपूर्ण परिसर देशाच्या भविष्यातील अर्थव्यवस्थेला मोठी गती देणार असून, हाच परिसर भारताच्या विकासाचे पुढील मुख्य केंद्र ठरणार आहे, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या सोहळ्याप्रसंगी मेघालय राज्याचे मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा, मेघालय राज्याचे उपमुख्यमंत्री प्रेस्टोन टिनसोंग, मेघालय राज्याचे सामान्य प्रशासन विभाग मंत्री सोस्थेनिस सोहतुन यांच्यासह खासदार मिलिंद देवरा, आमदार मंदाताई म्हात्रे,आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, मेघालय राज्याचे मुख्य सचिव शकील अहमद, मेघालय राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाचे आयुक्त व सचिव सिरिल व्ही. डी. डिएंगडोह, कोकण विभागीय महसूल आयुक्त रुबल अग्रवाल, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सिडकोचे मुख्य महाव्यवस्थापक अश्विन मुद्‌गल, सिडकोचे सहव्यवस्थापक राजा दयानिधी, सिडकोचे सहव्यवस्थापक गणेश देशमुख, पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, पनवेल प्रांतअधिकारी पवन चांडक, तहसिलदार मिनल भामरे, तसेच मेघालय राज्यातील महाराष्ट्रात राहणारे विद्यार्थी आणि नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र आणि मेघालय या दोन्ही राज्यांच्या राज्यगीताने या सोहळयाचा प्रारंभ करण्यात आला. मेघालय राज्यातील जगप्रसिध्द पारंपारिक नृत्य शैलीत मेघालयीन कलाकरांनी सादरीकरण केले. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मेघालयाचे मुख्यमंत्री कॉनराड के.संगमा यांच्याकडे मेघालय भवनसाठीच्या जमिनीची कागदपत्रे हस्तांतरित करण्यात आली.

या सोहळ्यात उपस्थितांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दोन्ही राज्यांमधील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अनुबंधांवर प्रकाश टाकला. ईशान्य भारतातील विद्यार्थी, कलाकार आणि संगीत क्षेत्रातील दिग्गजांसाठी मुंबई व पुणे ही अत्यंत पसंतीची ठिकाणे आहेत. विशेषतः मेघालयच्या आत्म्यात वसलेल्या संगीताचा मुंबईच्या संगीत जगताशी अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आहे. त्यामुळेच खारघरसारख्या मोक्याच्या ठिकाणी आकारास येणारे हे मेघालय भवन केवळ एक इमारत नसून, मेघालयातून शिक्षणासाठी, वैद्यकीय उपचारांसाठी किंवा कला सादरीकरणासाठी येणाऱ्या नागरीक व विद्यार्थ्यांसाठी हक्काचे घर ठरेल.

नवी मुंबई परिसराच्या होत असलेल्या अभूतपूर्व विकासाचा उल्लेख करताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले की, या भागात जागतिक दर्जाच्या १२अव्वल विद्यापीठांचा समावेश असणारी 'एज्यु-सिटी' आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची 'मेडी-सिटी' उभारली जात आहे. सोबतच देशातील ६० टक्के डेटा सेंटर क्षमता याच परिसरात निर्माण होत असून, हे क्षेत्र न्यू-एज आणि डीप-टेक उद्योगांचे केंद्र बनत आहे. पुढील १० ते १५ वर्षांत जेव्हा मेघालयचे नागरिक या वास्तूचा वापर करतील, तेव्हा या नियोजित आणि भविष्याभिमुख जागेचे महत्त्व त्यांना अधिक स्पष्टपणे जाणवेल. मेघालय भवनाचे बांधकाम लवकरात लवकर आणि उत्कृष्ट दर्जात पूर्ण करण्यासाठी सिडको किंवा राज्य सरकारच्या यंत्रणांमार्फत सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासनही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले.

नवी मुंबईतील मोक्याच्या ठिकाणी 'मेघालय भवन'साठी जमीन उपलब्ध करून दिल्याबद्दल मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड संगमा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सिडको आणि स्थानिक आमदार मंदा म्हात्रे यांचे विशेष आभार मानले. मुंबईत उपचारासाठी येणारे रुग्ण, विद्यार्थी आणि व्यावसायिकांची वाढती संख्या पाहता जुन्या मेघालय भवनमध्ये जागेची मोठी अडचण भासत होती. नीती आयोगाच्या बैठकीत संगमा यांनी विनंती करताच अवघ्या काही सेकंदांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जमिनीचा प्रस्ताव मान्य केला. या उपक्रमाला त्यांनी पूर्व आणि पश्चिम भारताला जोडणारा आणि देशाच्या एकात्मतेला अधिक बळ देणारा एक ऐतिहासिक टप्पा मानला.

नवी मुंबईतील 'मेघालय भवन'च्या भूखंड हस्तांतरण प्रसंगी प्रास्ताविक करताना मेघालय राज्याचे मुख्य सचिव शकील अहमद यांनी या प्रकल्पासाठी जमीन उपलब्ध करून दिल्याबद्दल महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र शासन, सिडको आणि स्थानिक लोकप्रतिनिधींचे विशेष आभार मानले. मुंबईत वैद्यकीय उपचारासाठी येणारे रुग्ण, शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि उद्योजकांसाठी हे मेघालय भवन अत्यंत मोलाचे ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तसेच,महाराष्ट्राच्या सहकार्यामुळे मेघालय राज्याला आरोग्य, व्यापार आणि पर्यटनाच्या क्षेत्रात प्रगतीचे नवे मार्ग मिळतील, असे सांगत त्यांनी नव्याने लाभलेल्या खंबीर नेतृत्वामुळे मेघालय ही देशातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ठरल्याचे अधोरेखित केले.

## राजेश पाटील महानिर्मितीचे संचालक

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) मध्ये संचालक (प्रकल्प) या पदाचा पदभार राजेश पाटील यांनी प्रकाशगड मुख्यालय येथे स्वीकारला.

याप्रसंगी महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.) यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

या नियुक्तीपूर्वी श्री. राजेश पाटील हे महानिर्मितीमध्ये कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था-२ आणि प्रकल्प) म्हणून कार्यरत होते. ऊर्जा क्षेत्रातील ३२ वर्षांहून अधिक व्यापक अनुभवाच्या बळावर त्यांनी २१० मेगावॅट ते ६६० मेगावॅट सुपरक्रिटिकल युनिट्‌सच्या उभारणी तसेच संचलन, देखभाल दुरुस्तीमध्ये सखोल कौशल्य प्राप्त केले आहे.

महानिर्मितीच्या स्थापित क्षमता विस्तार उपक्रमांना गती देण्यात राजेश पाटील यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. विकसित महाराष्ट्र २०४७ अनुरूप महानिर्मितीच्या व्हिजन २०३५ आराखड्याच्या निर्मितीत त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. वीजनिर्मिती संचांची उभारणी व कार्यान्वित करणे तसेच कार्यक्षमता वाढविणे, इंधन व्यवस्थापन सुधारणा, उत्पादन खर्च कमी करणे यामधील त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

## महाडच्या गुरुकुल शाळेची वाट बिकट; पालकांमध्ये नाराजी

**महाड : प्रतिनिधी**



महाडमध्ये सुप्रसिद्ध असलेल्या गुरुकुल अकॅडमी या शाळेत जाणारा मार्ग अत्यंत खराब झाला असून, शाळा प्रशासनाचे याकडे संपूर्ण दुर्लक्ष करीत आहे. दगड गोट्यांमधून पालकांना मार्ग काढत मुलांना शाळेतून ने आण करावी लागत आहे. पालकांमध्ये याबद्दल प्रचंड नाराजी असून महिला पालक स्कुटी वरून जाताना अपघात होण्याची शक्यतावर व्यक्त करीत आहेत.

मुंबई गुहा महामार्ग लगत हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या वतीने चालविले जाणाऱ्या गुरुकुल अकॅडमी या शाळेमध्ये हजारोंच्या संख्येने विद्यार्थी शिकत आहे. मात्र ऐन पावसाळ्यामध्ये या शाळेत जाणारा मार्ग अत्यंत खराब झाला असून यावर नदीतील दगड गोटे टाकून रस्ता बनवला असल्याने या मार्गावरून विद्यार्थ्यांनी आणण्यासाठी पालकांना मोठ्या कष्टाने गाड्या चालवाव्या लागत आहेत.

## तिकीट तपासणीसाने जखमी प्रवाशाला वाचवून सुरक्षितस्थळी नेले

**रोहा : प्रतिनिधी**

डोंबिवली येथील मध्य रेल्वेच्या तिकीट तपासणी विभागातील कर्मचारी आणि मुख्य तिकीट तपासनीस श्रीमती वृषाली सावंत-जाधव यांनी प्रसंगावधान व कर्तव्यदक्षतेचे उत्तम उदाहरण सादर करत एका जखमी प्रवाशाला वाचवले.

५ ऑगस्ट रोजी, डोंबिवली स्थानकावरील फलाट क्रमांक ५ वर कर्तव्यावर असताना, श्रीमती जाधव यांच्या निदर्शनास आले की पूजा नावाची २३ वर्षे वयाची एक महिला प्रवासी ट्रेनमधून उतरताना प्लॅटफॉर्मवर पडली आहे. गर्दीमुळे, ट्रेनमधून उतरणाऱ्या इतर प्रवाशांचीही तिच्यावर धडक झाली. ती प्रवासी जखमी झाली होती आणि स्वतःहून उभी राहू शकत नव्हती.

श्रीमती जाधव यांनी त्वरित तिच्या मदतीसाठी धाव घेतली. मदतीसाठी परवानाधारक हमालाची व्यवस्था करण्याकरिता त्यांनी स्थानकावरील उद्‌घोषकास सांगितले. मात्र, जखमी प्रवाशाला तातडीने वैद्यकीय मदतीची गरज असल्याचे ओळखून त्यांनी मानवता आणि कर्तव्यदक्षतेचे दर्शन घडवत, श्रीमती जाधव यांनी परवानाधारक हमालाची वाट न पाहता, त्या जखमी प्रवाशाला स्वतःच्या हातांत उचलले आणि स्टेशन व्यवस्थापकांच्या कार्यालयाच्या दिशेने धाव घेतली. त्यानंतर त्या प्रवाशाला पुढील वैद्यकीय उपचारांसाठी त्वरित जवळच्या रुग्णालयात पाठवण्यात आले.

मध्य रेल्वे, स्थानकात श्रीमती वृषाली सावंत-जाधव यांच्या या तत्पर आणि संवेदनशील कृतीचे कौतुक करते. त्यांच्या या वेळेवर केलेल्या मदतीमुळेच त्या जखमी प्रवाशाला त्वरित वैद्यकीय उपचार मिळू शकले.मध्य रेल्वे प्रवाशांना आवाहन करते की, ट्रेनमध्ये चढताना आणि उतरताना काळजी घ्यावी. कृपया आधी उतरणाऱ्या प्रवाशांना खाली उतरू द्यावे.मध्य रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेप्रती आपली कटिबद्‌धता पुन्हा अधोरेखित करते आणि अशा आघाडीवरील कर्मचाऱ्यांच्या सेवेची दखल घेते, जे गरजू प्रवाशांना मदत करण्यासाठी आपल्या कर्तव्याच्या पलीकडे जाऊन कार्य करतात.

## कालिवली ते सारसई रस्ता खचला; अपघाताची भीती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी परिसरातील ग्रामपंचायत चावणे हद्दीत येणाऱ्या कालिवली ते सारसई या गावांना जोडणाऱ्या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. रस्त्याचा काही भाग खचल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून मोठा अपघात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या मार्गावरून दररोज अवजड वाहने, कंपन्यांमधील कामगार तसेच विद्यार्थी मोठ्या प्रमाणात प्रवास करतात. रस्ता खचल्यामुळे एखादे वाहन खाली कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, संबंधित ठिकाणी प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारचे रॅलींग किंवा सुरक्षित कठडे उभारण्यात आलेले नाहीत.अपघात टाळण्यासाठी ग्रामस्थांनी स्वतः पुढाकार घेत खचलेल्या ठिकाणी दगडगोटे ठेवून तात्पुरती खबरदारी घेतली आहे. मात्र, हा उपाय अपुरा असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

याबाबत सामाजिक कार्यकर्ते संतोष शिंगाडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखी निवेदन देऊन तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, ग्रामस्थांनीही रस्त्याचे काम तात्काळ हाती घेऊन नागरिकांच्या सुरक्षेची हमी द्यावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.

## मासेमारी हंगामाची लगबग सुरू; १५ ऑगस्टपासून मच्छीमारीला सुरुवात

**मुरुड : प्रतिनिधी**



मासेमारी हंगाम सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक राहिल्याने मच्छीमार बांधवांमध्ये लगबग वाढली आहे. आगामी १५ ऑगस्टपासून मच्छीमारी हंगामाला सुरुवात होणार असल्याने बोटींची दुरुस्ती, जाळ्यांची डागडुजी, इंजिनची तपासणी तसेच आवश्यक साहित्याची खरेदी करण्याची कामे जोरात सुरू आहेत.

पावसाळ्यातील बंदीनंतर पुन्हा एकदा समुद्रात मासेमारीसाठी जाण्याची तयारी मच्छीमारांकडून करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी बोटी किनाऱ्यावर आणून त्यांची रंगरंगोटी व दुरुस्ती केली जात आहे. तसेच खराब झालेली मासेमारीची जाळी बदलणे आणि नवीन जाळी तयार करण्याचे कामही अंतिम टप्प्यात आहे.

नवीन हंगामात चांगली मासळी मिळून उत्पन्न वाढेल, अशी अपेक्षा मच्छीमार व्यक्त करत आहेत. मासेमारी सुरू झाल्यानंतर बाजारपेठेत ताज्या मासळीची आवक वाढण्याची शक्यता असून, ग्राहकांनाही विविध प्रकारच्या मासळीचा पुरवठा होणार आहे.हंगामाच्या पार्श्वभूमीवर मच्छीमार कुटुंबांमध्येही उत्साहाचे वातावरण असून, गेल्या काही दिवसांपासून तयारीला वेग आला आहे.

## तळा तालुक्यातील विद्यार्थ्यांना जिजाऊ फाउंडेशनचा आधार!



**तळा : प्रतिनिधी**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे प्राथमिक विभाग, गो. म. वेदक विद्यामंदिर, कला- वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, आणि द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले आहे.

'जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था, महाराष्ट्र' यांच्या वतीने हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी जिजाऊ सामाजिक व शैक्षणिक संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांनी तळा तालुक्यातील मोठे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना जिजाऊ फाऊंडेशनच्या वतीने पूर्ण सहकार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला. या दिमाखदार सोहळ्यासाठी जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे, तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पान १ वरुन**

## पनवेलमध्ये महारोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

ग्लोबवर्क इन्फोटेक, टाइम्सप्रो (टाइम्स ऑफ इंडिया ग्रुप), एनआयआयटी लिमिटेड आयएफबीआय, आयडीबीआय इन्फोटेक लिमिटेड, बीटीडब्ल्यू फायनान्शियल सर्व्हिसेस अँड आयएमएफ प्रायव्हेट लिमिटेड, प्रोव्हॅल्यू बिझनेस सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड, आयप्रोसेस सर्व्हिसेस इंडिया लिमिटेड, पीपल लॅब ॲडव्हायजरी, स्मार्टटेक बिझनेस मॅनेजमेंट, मायवे टेक्नॉलॉजीज, कोडर टेक्नॉलॉजीज आदी कंपन्यांचा सहभाग होता.

या मेळाव्याचे अत्यंत नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध आयोजन करण्यात आले होते. उमेदवारांची नोंदणी, कंपन्यांची माहिती, मुलाखतीसाठी स्वतंत्र व्यवस्था, मार्गदर्शन कक्ष तसेच उमेदवारांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. हजारो उमेदवारांची उपस्थिती असूनही संपूर्ण प्रक्रिया सुरळीतपणे पार पडली. आयोजक, स्वयंसेवक आणि संबंधित कार्यकर्त्यांच्या समन्वयामुळे मेळाव्याचे उत्तम नियोजन पाहायला मिळाले. आजच्या स्पर्धात्मक युगात युवकांना केवळ शिक्षणच नव्हे तर त्यांच्या कौशल्याला योग्य रोजगाराची संधी मिळणे अत्यंत गरजेचे आहे. ही गरज लक्षात घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यामुळे पनवेल आणि परिसरातील युवकांना रोजगार, करिअर आणि उद्योग क्षेत्राशी थेट जोडले जाण्याचे महत्त्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध झाले. यावेळी सहभागी झालेल्या उमेदवारांनी मेळाव्याच्या आयोजनाचे आणि उपलब्ध करून देण्यात आलेल्या रोजगाराच्या विविध संधींचे कौतुक केले.

**मुलाखतीसाठी विशेष मार्गदर्शन**

रोजगार मेळाव्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे उमेदवारांना केवळ रोजगाराच्या संधी उपलब्ध करून न देता मुलाखतीला प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी विशेष मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले. मुलाखतीच्या वेळी स्वतःची ओळख कशी करून द्यावी, आत्मविश्वासाने प्रश्नांची उत्तरे कशी द्यावीत, आपल्या कौशल्यांची मांडणी कशी करावी, तसेच कंपनीच्या अपेक्षा समजून घेऊन मुलाखतीची तयारी कशी करावी, याबाबत उमेदवारांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनीदेखील मुलाखतीसाठी आलेल्या उमेदवारांशी संवाद साधून त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. रोजगाराच्या संधींचा योग्य पद्‌धतीने उपयोग करून घेण्यासाठी आत्मविश्वासाने मुलाखतीला सामोरे जाणे, आपल्या कौशल्यांवर विश्वास ठेवणे आणि उपलब्ध संधींचे सोने करणे याबाबत त्यांनी उमेदवारांना प्रोत्साहित केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे उमेदवारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

**युवकांसाठी रोजगाराचे प्रभावी व्यासपीठ**


पनवेल परिसरातील अनेक युवक-युवती शिक्षण पूर्ण करून रोजगाराच्या शोधात असतात. कंपन्यांमध्ये उपलब्ध विविध रोजगाराच्या संधी व स्थानिक युवक यांच्यात थेट समन्वय साधण्याचे काम या महारोजगार मेळाव्याच्या माध्यमातून करण्यात आले. उमेदवारांना विविध कंपन्यांत एकाच ठिकाणी अर्ज करण्याची व मुलाखती देण्याची संधी मिळाली. या मेळाव्यामुळे युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याबरोबरच कंपन्यांनाही आवश्यक मनुष्यबळ शोधणे सुलभ झाले. स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजन समितीच्या वतीने सांगण्यात आले. महारोजगार मेळाव्याला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे पनवेल परिसरातील युवक-युवतींसाठी रोजगाराच्या नव्या संधींचे दालन खुले झाले आहे.

## प्रभाग १९मध्ये स्वच्छता अभियान

या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक राजू सोनी, अजय बहिरा, नगरसेविका दर्शना भोईर, माजी नगरसेविका रेनुका मोहोकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शिवदास कांबळे, उद्योजक राजू गुप्ते, पनवेल शहर चिटणीस रूपेश नागवेकर, प्रशांत झुंजारराव, विनू पोटे, संजय जैन, पनवेल शहर युवा मोर्चा अध्यक्ष हिमेश बहिरा यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मिडलक्लास सोसायटीतील रहिवासी उपस्थित होते.


## दुखवटा

### सुलोचना येरुणकर



**चौक :** श्रीमती सुलोचना मधुकर येरुणकर यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी दुखःद निधन झाले. खालापूर तालुक्यातील मौजे विणेगाव येथील कष्टकरी,दानशूर, प्रेमळ आणि उन्नतीच्या मार्गाने काम करणाऱ्या महिला म्हणून त्यांचा परिचय परिसरात होता. त्यांच्या मागे तीन विवाहित मुलगे, एक विवाहित मुलगी, सुना, जावई, नातवंडे, परतूंड असा मोठा परिवार आहे.

### नर्मदा वर्तक



**पेण :** तालुक्यातील मोठे वढाव येथील नर्मदा धर्माजी वर्तक यांचे वयाच्या ९३ वर्षी वार्धक्याने निधन झाले. नर्मदा आजी परमपूज्य शंकर महाराज रसाळ कोळेवाडी ( सातारा) यांच्या त्या अनुग्रही होत्या. नर्मदा आजींचे दिवसकार्य शनिवार ८ ऑगस्ट २०२६ रोजी झाले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

## खारघरमध्ये सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी, खारघर यांच्या वतीने पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून खारघरमध्ये सामाजिक उपक्रमांचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते. या निमित्ताने खारघर मध्ये हे शिबिर पार पडले.



या शिबिरामध्ये महिलांसाठी 'महिला सन्मान योजने'अंतर्गत ५० टक्के सवलतीचे एसटी पास, ज्येष्ठ नागरिकांसाठी 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजने'अंतर्गत सवलत कार्ड तसेच दिव्यांग व विद्यार्थ्यांसाठी विविध प्रवास सवलतींचे कार्ड काढण्यात आले. याचसोबत एसटी बस, मेट्रो आणि इतर बस प्रवासासाठी उपयुक्त ठरणारे बहुउपयोगी एनसीएमसी कार्डही नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आले.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन उपस्थित नागरिकांना व कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या. या सामाजिक उपक्रमावेळी भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, खारघर मंडळ अध्यक्ष नगरसेवक प्रवीण पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, संतोष शर्माजी, दीपक शिंदे, स्नेहल बोधई, नीलम विसपुते, अजय माळी, प्रीती शर्मा, औदुंबर कदम, राजेश पांडे, रजनी शर्मा, स्नेहल गटकळ, रचना चौधरी, निशी शर्मा, महाडिक गजानन, कविता गोले, किशोर गोले, रोहित शर्मा, मंजू शुक्ला यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजप खारघरतर्फे अपघाती विमापत्रांचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव तथा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेलपरिसरात विविध सामाजिक उपक्रमांचा धडाका सुरू आहे. याच सामाजिक बांधिलकीच्या अंतर्गत भारतीयजनता पार्टी खारघर आणि प्रभाग क्रमांक ४ मधील सर्व नगरसेवकांच्या संयुक्त विद्यमाने अपघाती विमावाटप कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवारी खारघर येथील भाजप मध्यवर्ती कार्यालयात करण्यात आले होते.



या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर आणि महापौर नितीन पाटील यांनी भेट देऊन अपघाती विमा पत्रांचेवाटप केले.

वाढदिवसाच्या निमित्ताने केवळ शुभेच्छांचा स्वीकार न करता नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणिआरो१२यासाठी अशा प्रकारे थेट फायदेशीर ठरणारे उपक्रम राबवल्याबद्दल उपस्थितांनी खारघर भाजप व प्रभाग ४ मधील लोकप्रतिनिधींचे कौतुक केले. या विमा संरक्षणामुळे अनेक कुटुंबांना मोठा आधार मिळणारआहे.

या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, भाजपचे खारघर शहर मंडळ अध्यक्षतथा नगरसेवक प्रवीण पाटील,भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, नगरसेवक मधू पाटील, नरेशठाकूर,समीर कदम, नगरसेविका परेशा पटेल, अनिता पाटील, माजी नगरसेविका संजना कदम, भाजपनेते वासुदेव पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपतर्फे विचुंबेला भव्य आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून न्यू इरा हॉस्पिटल, डॉक्टर डी. वाय. पाटील रुग्णालय आणि भारतीय जनता पार्टी विचुंबे यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबीर व मोफत औषधे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विचुंबे येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत हे शिबीर अत्यंत उत्साहात संपन्न झाले.



या प्रसंगी आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिबिराला भेट देऊन पाहणी करुन आढावा घेतला. वाढदिवसाच्यानिमित्ताने सर्वसामान्यांच्या आरोग्याशी निगडित आणि अत्यंत उपयुक्त उपक्रम आयोजित केल्याबद्दल त्यांनी आयोजकांचे व वैद्यकीय पथकाचे आभार मानले.

या आरोग्य शिबिराच्या माध्यमातून विचुंबे व परिसरातील गरजू नागरिकांनी, महिलांनी व वृद्धांनी मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. शिबिरात आलेल्या नागरिकांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले, तसेच तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने रुग्णांवर सखोल उपचार करून त्यांना भविष्यातील आरोग्याविषयी योग्य ते वैद्यकीय मार्गदर्शन व सल्ला दिला.

ग्रामीण भागातील नागरिकांपयरत उत्तम आरोग्य सुविधा पोहोचाव्यात या उद्देशाने आयोजित करण्यातआलेल्या या शिबिराबद्दल परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. या वेळी पनवेल पंचायत समितीच्या सदस्या नीलम भिंगारकर, माजी सरपंच प्रमोद भिंगारकर, प्रभारी सरपंच भगत पाटील, किशोर सुरते,माजी उपसरपंच रवींद्र भोईर, अविनाश गायकवाड, अनिल भोईर, अप्पा गायकवाड, ग्रामपंचायत सदस्या विभूती सुरते, स्वाती पाटील, प्रगती गोंधळी, आरती गायकवाड, श्रावणी भोईर, डी. के. भोईर, संजीतभिंगारकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ आणि नागरिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

## इनरव्हील क्लबच्या समुदाय सेवा उपक्रमांतर्गत स्वच्छता मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून इनरव्हील क्लबच्या समुदाय सेवा उपक्रमांतर्गत शनिवारी सकाळी ७:३० वाजता पनवेल एस.टी. स्थानक परिसराच्या स्वच्छतेसाठी एक महत्त्वपूर्ण 'स्वच्छता मोहीम' राबवण्यात आली. आपल्या पर्यावरणाचे रक्षण आणि पुनर्संचयित करण्याच्या उद्देशाने सुरू केलेला हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प होता.



या अभियानात नगरसेवक जगदीश गायकर, आप्पा शिंदे, मंगेश पलवीलकर, शुभांगी बहिरा, प्रतिभा लादे, संजीवनी मालवणकर, सपना पाटील ,कविता पाटील अरुणा पाटील सोनल महाडिक,जयश्री कामेरकर पनवेल महानगरपालिकेचे कर्मचारी सहभागी झाअले होते

यावेळी इनरव्हील क्लबच्या सदस्या, नगरसेविका दर्शनाताई भोईर यांनी ही मोहीम भव्य प्रमाणात यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

## सीकेटी विद्यालयात 'गुड टच, बॅड टच'बाबत मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यम विभागातील विद्यार्थिनींसाठी संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या संचालिका वर्षा ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता तिसरी ते सहावीच्या विद्यार्थिनींसाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच त्यांच्यामध्ये वैयक्तिक सुरक्षितता व योग्य-अयोग्य स्पर्शाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी शाळेत 'गुड टच, बॅड टच' या विषयावर विशेष मार्गदर्शनपर प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.




प्रथमतः कार्यक्रमासाठी उपस्थित प्रवया डॉ. समिधा गांधी त्याचबरोबर आयुर्वेदिक डॉक्टर तसेच इनर व्हील क्लब च्या प्रेसिडेंट डॉ. अमृता नाईक, मीनल टिपणीस, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या संचालिका वर्षा ठाकूर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाद्वारे डॉ . समिधा गांधी यांनी विद्यार्थिनींना योग्य व अयोग्य स्पर्शाची ओळख, वैयक्तिक सुरक्षितता आणि शरीराच्या गोपनीयतेचे महत्त्व अत्यंत सोप्या व समजण्यासारख्या पद्धतीने समजावून सांगण्यात आले. विद्यार्थिनींना कोणताही स्पर्श अस्वस्थ करणारा किंवा चुकीचा वाटल्यास घाबरून न जाता ठामपणे 'नाही' म्हणणे, सुरक्षित ठिकाणी जाणे आणि विश्वासू व्यक्तीला त्याबाबत सांगणे याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

तसेच, कोणतीही अडचण किंवा अनुचित अनुभव आल्यास तो मनात न ठेवता आई-वडील, शिक्षक किंवा विश्वासू व्यक्तीशी मोकळेपणाने संवाद साधावा, असा मौल्यवान संदेश विद्यार्थिनींना देण्यात आला. विद्यार्थिनींच्या शंकांचे निरसन करून त्यांना स्व-सुरक्षेबाबत आवश्यक माहिती देण्यात आली.तसेच उपस्थित मान्यवर डॉ. अमृता नाईक यांनी अशा प्रकारच्या उपक्रमाचे आयोजन केल्यामुळे समाधान व्यक्त केले.

सदर कार्यक्रमासाठी डॉ. समिधा गांधी त्याचबरोबर आयुर्वेदिक डॉक्टर तसेच इनर व्हील क्लब च्या प्रेसिडेंट डॉ. अमृता नाईक, मीनल टिपणीस, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या संचालिका वर्षा ठाकूर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे, इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे तसेच पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, त्याचबरोबर पर्यवेक्षिका वैशाली पारधी आणि शाळेतील महिला शिक्षिका उपस्थित होते.

## खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये इन्व्हेस्टीचर सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना प्रोत्साहन देणारा १५ वा इन्व्हेस्टीचर सोहळा संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याअध्यक्षतेखाली शुक्रवारी अत्यंत उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात झाला.



शिस्त, नेतृत्व,जबाबदारी आणि सेवाभाव या मूल्यांची जोपासना करणाऱ्या या सोहळ्यात सन २०२६-२७ या शैक्षणिकवर्षासाठी निवड झालेल्या विद्यार्थी परिषद सदस्यांना त्यांच्या हस्ते पदाची शपथ देण्यात आली. यंदाच्या विद्यार्थी परिषदेत आदेश पुजारी हेड बॉय, सिया पाटील हेड गर्ल, अनुराग पांडे असिस्टंट हेड बॉय तर ऋजुता चव्हाण असिस्टंट हेड गर्ल म्हणून निवड करण्यात आली. याशिवाय रेड, ब्ल्यू, ग्रीन आणि यलो हाऊसचे कॅप्टन, वाईस कॅप्टन तसेच हेड प्रीफेक्टस यांचीही ओळख करून देण्यात आली. सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी शाळेचा गौरव वाढविण्यासाठी कर्तव्यनिष्ठ राहण्याची शपथ घेतली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक गीत, नृत्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मनेजिंकली. इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंतविद्यार्थ्यांचागुणगौरव करण्यात आला. .

या सोहळ्याला संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, वर्षा ठाकूर, महापौर नितीन पाटील, नगरसेवक परेश ठाकूर, अर्चना ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख,राहुल घरत, सचिव एस.टी.गडदे, भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, नगरसेविका परेशा पटेल, अनिता पाटील, महिला मोर्च्याच्या साधना पवार, दीपक शिंदे, स्वप्नील ठाकूर, आदेश ठाकूर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक केले.

## सीकेटी महाविद्यालयात इतिहास विभागातर्फे मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने दि. ०३ ऑगस्ट ते ०८ ऑगस्ट २०२६ याकालावधीत मोडीलिपी प्रारंभिक व प्रगत प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेसाठी प्रसिद्ध मोडीलिपी अभ्यासक श्री. महेश जोशी, अध्यक्ष वसुंधरा भाषा मोडीलिपी संवर्धन आणि संशोधन केंद्र, पुणे हे प्रमुख प्रशिक्षक लाभले होते. या कार्यशाळेचा उद्घाटन समारंभ सोमवार( दि.०३) रोजी संपन्न झाले. यावेळी इतिहास विभाग प्रमुख डॉ. रत्नप्रभा म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. इतिहास विभागातील ३० विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत उस्फुर्त सहभाग घेतला होता. कार्यशाळेत महेश जोशी यांनी विद्यार्थ्यांना मोडीलिपी अध्ययनाचे आणि संशोधनाचे महत्त्व समजावून सांगून मोडीलिपीचे प्रारंभिक ज्ञान देवून स्वतःचे नाव लिहिणे,मोडी लिपी लिप्यांतर, उतारा वाचन, पत्रलेखन व नाममुद्रा बनविण्यास शिकविले. या कार्यशाळेचा समारोप शनिवार (दि.०८) रोजी झाला.कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.(डॉ.)एस.के.पाटील, डॉ. बी. डी. आघाव यांनी मार्गदर्शन केले.



## अजिवली जनआरोग्य समितीच्या अध्यक्षपदी हर्षदा घरत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील प्राथमिक आरोग्य केंद्र, अजिवली येथे जनआरोग्य समितीची सभा उत्साहात संपन्न झाली. या सभेत रायगड जिल्हा परिषद सदस्या तथा बांधकाम व शिक्षण-क्रीडा समिती सदस्या हर्षदा अतुल घरत यांनी अध्यक्षस्थान भूषविले, तर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अपर्णा पवार यांनी सहअध्यक्ष म्हणून उपस्थित राहून सभेचे मार्गदर्शन केले. यावेळी पंचायत समिती सदस्य, जनआरोग्य समितीचे सदस्य, विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अजिवली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात ३६ महसुली गावे तसेच १९ पाडे, वाड्या आणि वस्त्या येतात. या परिसरातील हजारो नागरिकांना प्राथमिक उपचार, माता-बाल आरोग्य सेवा, लसीकरण, संसर्गजन्य रोग नियंत्रण, कुटुंब कल्याण, आरोग्य जनजागृती आणि विविध शासकीय आरोग्य योजनांचा



लाभ या केंद्रामार्फत दिला जात असल्याने ग्रामीण आरोग्य व्यवस्थेत या केंद्राला विशेष महत्त्व आहे.

सभेमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राच्या विविध आरोग्यविषयक कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नागरिकांना अधिक दर्जेदार, सुलभ व परिणामकारक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजना, आगामी आरोग्य उपक्रमांचे नियोजन, सार्वजनिक आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्याबाबत तसेच ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.यावेळी आरोग्य सेवा पुरवताना सहकार्य करणारे भाजप युवा नेते अतुल घरत यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा उल्लेख करण्यात आला.

नवनियुक्त अध्यक्ष हर्षदा घरत यांनी जनआरोग्य समितीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकापर्यंत गुणवत्तापूर्ण व सहज उपलब्ध आरोग्य सेवा पोहोचविण्यास प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. तसेच जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आरोग्य सुविधांच्या उन्नतीसाठी आवश्यक पाठपुरावा सातत्याने केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.सभेची सांगता 'टीबी मुक्त ग्रामपंचायत' पुरस्कार वितरण सोहळ्याने झाली. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली कार्यक्षेत्रातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, आशा स्वयंसेविका, गटप्रवर्तक, आरोग्य कर्मचारी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** पळस्पे पुलाखाली रस्त्याच्या कडेला पार्क करून ठेवलेली यामाहा मोटारसायकल अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साहिल लाहणे रा. भिंगारवाडी यांनी त्यांची यामाहा कंपनीची काळ्या रंगाची मोटारसायकल पळस्पे पुलाखाली रस्त्याच्या कडेला पार्क केली होती. अज्ञात चोरट्याने ही दुचाकी चोरून नेली.

### अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्थानकाजवळील शिवमंदिरासमोर एका अनोळखी इसमाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. .पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंदाजे ५५ ते ६० वर्षे वयाचा हा अनोळखी पुरुष इसम पनवेल रेल्वे स्थानकाजवळील शिवमंदिरासमोर बेशुद्ध अवस्थेत पडलेला आढळून आला. त्याला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर त्याला मृत घोषित केले. मृत इसमाचे वर्णन वय अंदाजे ५५ ते ६० वर्षे, रंग काळापांढरा, उंची अंदाजे ५ फूट २ इंच असे असून, त्याच्या अंगावर कोणतीही ओळख पटेल अशी वस्तू नसल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक संजय अस्पतवार करीत आहेत.

### दुचाकीची चोरी

**पनवेल :** पनवेल शहरातील गुणे हॉस्पिटलसमोर पार्क करून ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.रामदास मारुती भोपी रा. हरिग्राम, यांनी त्यांची हिरो एचएफ डिलक्स दुचाकी गुणे हॉस्पिटलसमोर पार्क करून ठेवली होती. परत आल्यावर दुचाकी जागेवर नसल्याचे निदर्शनास आले.





# दिल चाहता है @२५ वर्षे

## कायमच तारुण्यात राहिलेला चित्रपट...

एखादी मुव्हीज कायमच तारुण्यात राहण्याची कारणे काय असतात? आजची जेन झी आणि जेन अल्फा पिढी चित्रपट, सिनेमा, फिल्म असं न म्हणता मुव्हीज म्हणते म्हणून तसं म्हटलं. चित्रपटाची थीम (अर्थात गोष्ट, कथा) त्या चित्रपटाचे वय जाणवून देत नाही की त्या मुव्हीजचे रुपेरी पडद्यावरील सादरीकरण (सोप्या भाषेत सांगायचे तर दिग्दर्शन) त्या मुव्हीजला कायमच 'यंग' अर्थात तरुण ठेवते?

फरहान अख्तर लिखित आणि दिग्दर्शित 'दिल चाहता है' (मुंबईत प्रदर्शित १० ऑगस्ट २००१) या मुव्हीजमध्ये तीन तरुण मित्रांची फ्रेंडशिप आहे, त्यांची भिन्न प्रकारची लव्ह स्टोरी आहे, त्यांचीच सहलही आहे, एक प्रकारचा हा ट्रॅव्हल मुव्हीज आहे आणि हे सगळे एकात एक असं काही गुरफटलय की आपण पडद्यावरच्या विश्वात मग्न होऊन जातो, हरवून जातो, हरखून जातो. बरं, पंचवीस वर्षांपूर्वी ही मुव्हीज एन्जॉय करताना तसं वाटलं हे स्वाभाविक आहे. नवीन शतक सुरु झाले होते. २००१ हे या दशकाचे पहिलेच वर्ष होते. जागतिकीकरण आणि खुली अर्थव्यवस्था यातून आलेला सामाजिक सांस्कृतिक माध्यमातील बदल रुजत होता. अशातच


झूम प्रहर



दिलीप ठाकूर


चित्रपट समीक्षक


इनकमिग आणि आऊटगोविंग अजून फार स्वस्त नसलं तरी हळूहळू मोबाईल फोन हाती येत होता. मल्टिप्लेक्स युगाची सुरुवात होती, तरी एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्समध्ये आपण रमलो होतो, उपग्रह वाहिन्यांच्या संख्येत वाढ होत होती. मनोरंजन उपग्रह वाहिन्या, वृत्त वाहिन्या, क्रीडा वाहिन्या विस्तारत होत्या.

मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवेचे नाविन्य अजून कायम होते. राकेश रोशन निर्मित आणि दिग्दर्शित ' कहो... ना प्यार है '( २०००) च्या अतिशय फ्रेश, तजेलदार, उत्फूर्त प्रेमकथेला तरुण पिढीने दिलेल्या मनसोक्त मनमुराद प्रतिसादाने खुललेले, फुललेलं दिलखुलास मनमोकळे वातावरण कायम होते. अनिल शर्मा दिग्दर्शित 'गदर एक प्रेमकथा' आणि आमिर खान प्रॉडक्शनचा आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'लगान' ( मुंबईत दोन्ही चित्रपट प्रदर्शित १५ जून २००१ला प्रदर्शित) च्या खणखणीत यशाने चित्रपटगृहावर हाऊसफुल्लचा फलक दिसत होता. लगानबरोबरच दिल चाहता हैचा एक मिनिटाचा पहिला ट्रेलर चित्रपटगृहात दाखवला जाऊ लागला ही या चित्रपटाकडे रसिकांना आकृष्ट करण्यासाठीची मस्त पायाभरणी.

दिल चाहता हैसारखा तरुण चित्रपट प्रदर्शित होण्यास सकारात्मक वातावरण होते. चित्रपट प्रदर्शित होण्याची काळ, वेळ, वातावरण खूप खूप महत्वाचे असते, चित्रपट अभ्यासक्रमात याचीही दखल आवश्यक आहे. चित्रपट कसा आहे याबरोबरच तो कधी प्रदर्शित झाला हेही अधोरेखित होणे आवश्यक.

दिल चाहता हैची गाणी लोकप्रिय असल्याने चित्रपट कधी पाहतोय असं झालं होतं. लोकप्रिय गाणी चित्रपटासाठी सपोर्ट सिस्टीम असतात. संगीतकार शंकर एहसान लॉय हे एम टीव्ही पिढीचे संगीतकार होते. विशेष म्हणजे जावेद अख्तर यांनी आपल्या गीतलेखनात नवीन पिढीचा मूड पकडला होता. (तोपर्यंत त्यांची चित्रपटसृष्टीतील वाटचाल तीसपेक्षा जास्त वर्षांची झाली होती. त्यांना काळासोबत बदलणं जमलं याचं कौतुक आहे.) या चित्रपटातील गाण्यांच्या चालीवर काम करण्यासाठी निर्माता रितेश सिधवानी आणि संगीतकार शंकर एहसान लॉय हे लोणावळा येथे दुहेरी दौऱ्यावर गेले. त्यांनी पासष्ट टक्के प्रमाणात पिकनिक एन्जॉय केली आणि त्यातूनच त्याना मिळालेल्या उर्जेतून चाली बांधल्या. म्हणजे काम पस्तीस टक्के केले. चित्रपटाच्या जडणघडणीत असे अनेक फॅक्टर असतात आणि ते आवश्यकही असतात. आणि हे नवीन पिढीचे समीकरण आहे. या चित्रपटातील दिल चाहता है (पार्श्वगायक शंकर



महादेवन), जाने क्यू लोग प्यार करते है (उदित नारायण), वो लडकी है कहा (शान आणि कविता कृष्णमूर्ती), कोई कहे कहता रहे (शंकर महादेवन, शान आणि के के), तनहाई ( सोनू निगम), कैसी है यह रुत ( श्रीनिवास) ही गाणी पटकथेच्या ओघात येतात आणि आपण चित्रपटात गुंतत गुरफटत जातो. चित्रपटाच्या हलक्या फुलक्या खेळकर मूडला ही गाणी पूरक ठरल्याने ही गाणी ऐकताना अथवा गुणगानताना त्यांचे पडद्यावरचे सादरीकरण डोळ्यासमोर येते. चित्रपट निर्मितीत सगळेच घटक रस घेणारे असल्याचा हा सुपरिणाम. हेअर स्टाईलीश अधुना भवानी हिचा हा पहिलाच चित्रपट. तिने नवीन पिढीतील हेअरस्टाईलची आवडनिवड आणि या चित्रपटातील व्यक्तीरेखा यांचे मस्त भान ठेवले. सर्वच बाजूंनी हा चित्रपट जमून आला आणि तारुण्यात राहिला.

या चित्रपटाचं वितरण यशराज फिल्म्स वितरण यांचे आहे. यात खास वैशिष्ट्य असं की, यशराज फिल्म्सने आपल्या बॅनरखालील चित्रपट वितरित करत असतानाच अन्य निर्मात्यांचे चित्रपट वितरित करण्यातही विशेष रस घेतला. या चित्रपटाची निर्मिती रितेश सिधवानी यांनी केली आहे. या चित्रपटाचं मुंबई, गोवा आणि ऑस्ट्रेलिया येथे चित्रीकरण झाले. छायाचित्रणकार रवि के. चंद्रन आहे आणि संकलन ए. श्रीधर प्रसाद यांचं आहे.विशेष म्हणजे या चित्रपटासाठी सिंक साऊंड सिस्टीम वापरण्यात आली हे तेव्हा विशेष उल्लेखनीय होते, याचं कारण चित्रीकरणाच्या वेळीच कलाकारांचे आवाज ध्वनिमुद्रीत होणं हे तेव्हा आपल्या देशातील चित्रपटसृष्टीत काहीसं नवीन होते. या चित्रपटाच्या तारुण्यात ही गोष्ट महत्त्वाची. चित्रपट माध्यम अनेक तांत्रिक गोष्टींनी आकार घेत घेत जाते, म्हणून हे सांगायला हवेच.

आकाश मल्होत्रा (आमिर खान), समीर (सैफ अली खान) आणि सिद्धार्थ (अक्षय खन्ना) या तीन मित्रांची फ्रेंडशिप आणि त्यांचे खेळकर खोडकर आणि अनुभवातून गंभीर होणार त्यांचे लाईफ हे या चित्रपटाचे मध्यवर्ती सूत्र.आकाश मल्होत्राची गर्लफ्रेंड शालिनी (प्रीती झिंटा), सिध्दार्थ आपल्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या तारा जैस्वाल (डिंपल कपाडिया)कडे आकर्षित होतो. तारा जैस्वाल ही इंटेरियर इंजिनिअर आहे. घटस्फोटीता आहे. हे अगदी वेगळे असे नातेसंबंध. समीरची मैत्रीण पूजा (सोनाली कुलकर्णी) या व्यक्तीरेखेभोवती हा चित्रपट रंगला. सैफ अली खान आणि सोनाली कुलकर्णी यांच्यावरचे यह लडकी है कहा या गाण्यातील प्रेक्षागृह दक्षिण मुंबईतील लिबर्टी चित्रपटगृह आहे.

फरहान अख्तर याने आपण गोवा आणि विदेशी केलेल्या भटकंतीवर आधारित डायरीवर ' हम तीन ' या नावाने पटकथा लिहिली. आणि ते नाव बदलून ' दिल चाहता है ' असं केले, ते एकदम फिट्ट बसले. चित्रपटाच्या नावात त्याचे व्यक्तिमत्त्व दिसायला हवे याचं हे एक उत्तम उदाहरण.

झोया अख्तरने या चित्रपटासाठी कलाकार निवडले. कास्टीग दिग्दर्शक ही एक नवीन संज्ञा तेव्हा विकसित होत होती. आकाश मल्होत्रा या व्यक्तीरेखेसाठी अक्षय खन्नाचा विचार जवळपास निश्चित झाला होता, आमिर खानने म्हटले, आपण ही भूमिका साकारु इच्छितो. अक्षय खन्नाने समजूतदारपणा दाखवला. (तोपर्यंत तो आपले स्थान निर्माण करण्यासाठी धडपडत होता. त्याला आणि सैफ अली खानला या तरुण चित्रपटाने फॉर्मात आणलं. चित्रपटाचं यश बरेच काही देते.) प्रीती झिंटाने या चित्रपटातील भूमिकेसाठी साडेतीन महिने भरपूर रिहर्सल केली, मेहनत घेतली आणि मगच कॅमेरासमोर उभी राहिली. या चित्रपटात अयूब खान, रजत कपूर, सुचित्रा पिलाई, युसुफ हुसेन, अहमद खान असे अनेक कलाकार आहेत. एकेकाळी दिलीपकुमारची कितवी नक्कल करतो असा प्रश्न पडलेल्या राकेश पांडेचीही या चित्रपटात छोटीशी का होईना पण भूमिका आहे. या चित्रपटातील गोव्यातील चित्रीकरण बहुचर्चित ठरले. विशेषतः चापोरी किल्ला परिसरात केलेले चित्रीकरण लक्षवेधक आहे. ऑस्ट्रेलियात सिडनी येथे चित्रीकरण झाले. चित्रपटाच्या सेटवर फरहान अख्तर याने आपल्याला आन्टी अशी हाक मारू नये, संबोधू नये असे डिंपल कपाडियाने अतिशय आग्रहाने सांगितले. हा चित्रपट तारुण्यात राहण्यासाठी ही गोष्टही महत्त्वाची.

एस्सेल एन्टरटेन्मेंट निर्मित 'दिल चाहता है' पंचवीस वर्षांचा झाला असं म्हणण्यापेक्षा दिल चाहता है हा कायमच पंचवीशीतील तरुण चित्रपट आहे असं म्हणूया. काही चित्रपट असेही असतात. असेही हवेत.

---

# ९ ऑगस्ट : जागतिक मूलनिवासी दिवस

भारतात हल्ली बऱ्याच ठिकाणी जागतिक आदिवासी दिवस साजरा करण्याची पद्धत रूढ केली जात आहे. मध्यंतरी नाशिक त्र्यंबकेश्वरला जाताना आदिवासी एकता वगैरेचे बॅनरही पाहिले होते!! आणि त्याच बरोबर त्यासंबंधी काही विद्रोहकडे वळणाऱ्या घोषणा!! ९ ऑगस्ट हा दिवस आत्तापर्यंत ऑगस्ट क्रांतिदिन म्हणून प्रसिद्ध होता. आता जागतिक आदिवासी दिवस म्हणून साजरा व्हावा, त्या दिवशी सार्वत्रिक सुट्टी जाहीर करावी अशा मागण्या व्हायला लागल्या आहेत!! डावे, मधले डावे, बाजूचे डावे, शहरी डावे (शहरी नक्षली असे म्हटलेले हल्ली आवडत नाही यांना!!), काँग्रेस, लिब्राडू मंडळी, विकाऊ पत्रकार, विकाऊ चॅनल्स, समाज माध्यमे (FB, युट्यूब वगैरे) यातून याचा जोरदार पुरस्कार सुरू आहे. काय आहे नक्की हा जागतिक मूलनिवासी दिवस? थोडी माहिती करून घेऊयात.

आपल्या सर्वांना माहिती आहेच की अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड वगैरे देश ह्या इंग्रज आणि युरोपियन यांच्या वसाहती होत्या. आजही मानसिकता तीच आहे!! या वसाहती कशा वसवल्या गेल्या?? त्या त्या ठिकाणी जे मूळचे स्थानिक रहिवासी होते त्याच्यावर अनन्वित आणि अमानवीय अत्याचार केले गेले, हजारो लाखो जणांची कत्तल केली गेली, वांशिक विच्छेद केला गेला, त्यांना गुलाम म्हणून वागविले गेले, त्यांची संस्कृती, पूजा स्थाने ध्वस्त करण्याचा प्रयत्न झाला. अमेरिकेतील मूळचे रेड इंडियन्स आज तुरळक प्रमाणात अस्तित्वात आहेत. लाखो जणांची कत्तल केली गेली. का? तर युरोपियन मंडळींना तिथे आपली वसाहत करायची होती.

लॅटिन अमेरिकन देश, आफ्रिकन देश इथेही असेच प्रकार झाले. शिवाय या सर्व ठिकाणी आढळणारी एक वास्तविकता म्हणजे वसाहतवादी मंडळींनी त्यांच्या जमिनी हडपल्या, संस्कृती उद्ध्वस्त केली, कत्तली केल्या आणि जे उरलेसुरले होते त्यांचे धर्मपरिवर्तन करायचा आटोकाट प्रयत्न केला!! यात चर्चचा लक्षणीय सहभाग होता !! आपण या मंडळींवर अत्याचार केला अशी काहीशी पुसट भावना युरोपियन मंडळींमध्ये होऊ लागली आहे. ऑस्ट्रेलियाच्या तत्कालीन पंतप्रधान केविन रुड यांना १३ फेब्रुवारी २००८ रोजी त्यांच्या संसदेत देशवासीयांची माफी मागावी लागली होती.

तर, अश्या या अत्याचार पीडित आणि आता फारच अल्पसंख्यांक झालेल्या युरोपियन देशांच्या वसाहती असलेल्या देशातील या मूलनिवासी बांधवांसाठी, त्यांच्या हक्कांसाठी काही करावे असे वाटल्याने, त्यांचे प्रश्न समजून घेण्याच्या उद्देशाने आणि त्यांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघाने एक समिती (Working Group) गठीत केली ज्यांची प्रथम बैठक ९ ऑगस्ट १९८२ रोजी झाली. या समितीने जवळपास १२ वर्षे यावर चर्चा आणि अभ्यास केला आणि त्याचा परिणामस्वरूप The United Nations General Assembly (UNGA) यांनी १९९४ साली ४९/२१४ या ठरावा द्वारे ९ ऑगस्ट हा अंतरराष्ट्रीय मूलनिवासी दिवस (International Day of Worlds Indigenous People) म्हणून जाहीर केला. मूलनिवासी समाजाचा आदर आणि त्यांचे हक्क आणि प्रश्न समजून घेऊन त्यासंबंधी जागृती या दिवशी करावी हा उद्देश!! शिवाय जगातील स्थानिक लोकांची परिस्थिती सुधारण्यासाठी, त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आणि त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी 'परमनंट फोरम ऑफ इंडिजिनस पीपल्सची' स्थापना केली.


आता ९ ऑगस्ट हाच दिवस का यालाही एक रक्तरंजित पार्श्वभूमी आहे, जे सत्य आपल्यापासून लपवले जाते. या दिवसाची सुरुवात खरं म्हणजे कोलंबस दिवसाच्या विरोधात झाली होती. हा तोच कोलंबस जो १४९२ साली अमेरिकेत पोचला होता आणि त्याने अमेरिकेतील मूलनिवासी लोकांचा संहार केला होता. १८१२ ते १८१५ दरम्यान अमेरिकेतील पोव्हटन (Powhatan) शहरात स्थानिक जनजाती आणि परदेशी ख्रिस्ती युरोपियन लोकांमध्ये मोठे युद्ध झाले आणि ९ ऑगस्ट या दिवशी चर्चने इंग्रजांना मदत करण्यासाठी मोठे सैन्य पाठवले, ज्यामुळे ३० हजाराहून अधिक स्थानिक आदिवासींचा मृत्यू झाला. यामुळे हा दिवस केवळ अमेरिकेच्या मूलनिवासी यांच्यावरील अत्याचारांच्या स्मरणार्थ निश्चित करण्यात आला आहे!! त्यामुळे खरं म्हणजे या दिवसाचा जगातील कोणत्याही देशाशी संबंध नाही आणि भारताशी तर नाहीच नाही!!

भारताला ही स्थानिक रहिवासी मूलनिवासी संकल्पना लागू पडते का याचा लेखाजोखा घ्यायला हवा!!

संयुक्त राष्ट्रांच्या मते जगभरात ४० देशांमध्ये ४३ कोटी आदिवासी आहेत, त्यापैकी २५%भारतात आहेत. यात एक बाब समजून घेण्याची अत्यंत गरज आहे. ती म्हणजे भारत सोडून बहुतांशी सर्व देशांमध्ये युरोपियन देशांनी वसाहत निर्माण केली गेली, त्यांना गुलाम केले गेले, त्यांच्या कत्तली केल्या, अत्याचार केले आणि या जमाती नष्ट करण्याचा प्रयत्न केला. भारतात मात्र असे काही झाले नाही. इंग्रजांनी भारतावर आक्रमण केले, अत्याचार केले, भारताला गुलाम केले. पण त्यांची वसाहत काही इथे होऊ शकली नाही!! त्या दृष्टीने पाहिले तर भारतातील आपण सर्वच मूलनिवासी आहोत!! वनवासी/ जनजाती यांच्यासह कुणीही बाहेरून आलेले नाही आणि सर्व जण एकोप्याने रहात होते.

मुळातच भारतात आदिवासी हा शब्द रूढ नव्हता. जनजाती किंवा वनवासी असे संबोधले जात होते. अगदी रामायण महाभारत काळात डोकावून पाहिले तरी आपल्याला हे सर्व जण समाजाच्या मूळ प्रवाहात असलेले पाहायला मिळतात. रामाची आई कौशल्या ही "कंवर" जमातीची. आजही "कंवर" कौशल्या ची मुलगी म्हणून पूजा करतात. प्रभुराम हे आदिवासी समाजाचे "भानेज" (पुतणे) म्हणून मानले जातात. माता कौशल्या ही कौशल प्रांताच्या राजाची कन्या!! प्रत्यक्ष श्रीकृष्ण यांची एक पत्नी जांबवंती. वनात राहणाऱ्या जनजातींचा राजा जांबवंत याची मुलगी!! श्रीकृष्णाचा नातू अनिरुद्ध यांचा विवाह वनवासी राजा बाण यांची कन्या उषा हिच्याशी झाला होता!! म्हणजे प्रत्यक्ष राम आणि श्रीकृष्ण यांचे वनवासी समाजाशी केवळ भावनिक आणि सामाजीकच नव्हे तर रक्ताचे नाते आहे!! आता या वनवासी आणि जनजाती बांधवांना वेगळे करून हे नाते नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे!!

संयुक्त राष्ट्रातील भारत सरकारच्या प्रतिनिधीने २००७ च्या यासंबंधीच्या एका घोषणेवर स्वाक्षरी करताना असेही



म्हटले होते की, भारतात राहणारे सर्व लोक इथले मूळ रहिवासी आहेत, कोणीही बाहेरून येथे आलेले नाही.

भारताने सांगितले की, भारताने सातत्याने स्थानिक लोकांच्या हक्कांची बाजू घेतली आहे आणि आदिवासींच्या हक्कांच्या घोषणेसाठी काम केले आहे. परिषदेसमोरील मजकूर ११ वर्षांच्या मेहनतीचे फळ आहे. मजकुरात "स्वदेशी" ची व्याख्या नव्हती. स्वयंनिर्णयाच्या अधिकाराच्या संदर्भात भारताची संपूर्ण लोकसंख्या स्वदेशी मानली जात होती. हे केवळ परकीय वर्चस्वाखाली असलेल्या लोकांसाठीच लागू होते, आणि ही समज असलेल्या स्वदेशी व्यक्तींच्या राष्ट्राला नाही. जाहीरनाम्याचा मसुदा स्वीकारण्याच्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यास भारत तयार होता आणि त्याच्या बाजूने मतदान करेल.

म्हणजे भारताने सुरवातीलाच हे स्पष्ट केले होते की स्थानिक निवासी/ मूलनिवासी ही संकल्पना भारताला लागू होत नाही. मात्र परकीय वर्चस्वाखाली असलेले जे आहेत त्यांच्यासाठी हा प्रस्ताव भारत स्वीकारत आहे!!

आता या पार्श्वभूमीवर भारतात सुरू असलेले "मूलनिवासी" आंदोलन, प्रचार काय आहे जे समजून घ्यायला हवे!! दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिनाच्या नावाने देशात ठिकठिकाणी छोटे-मोठे कार्यक्रम आयोजित केले जातात, ज्यामध्ये आदिवासी समाज तसेच इतर लोकही उत्साहाने सहभागी होतात. असे बहुतेक कार्यक्रम चर्च किंवा त्यांच्या प्रेरित संस्था आणि व्यक्तींद्वारे आयोजित केले जातात ज्यांचे स्वतःचे मूळ उद्दिष्ट धर्मांतराचे असते. या विषयाची संपूर्ण माहिती नसल्यामुळे आदिवासी समाजातील आणि आपल्यातील काही साधे आणि उत्साही लोकही याच वातावरणात वाहून जातात. त्यामुळे हा विषय गांभीर्याने समजून घेणे आवश्यक आहे.

भारतात हा दिवस आदिवासी दिन म्हणून साजरा केला जात आहे. वनवासी आणि जनजाती हे इथले मूलनिवासी आहेत असा प्रचार केला जात आहे. तुम्ही जंगलात रहाता, तुमची संस्कृती वेगळी आहे, तुमच्या चालीरीती वेगळ्या आहेत, समाजाच्या मूळ प्रवाहापासून तुम्ही वेगळे आहात असा भ्रामक प्रचार करण्यात चर्च प्रणित आणि डावी मंडळी बऱ्याच अंशी सफल होताना दिसत आहेत. वास्तविक इंग्रजांच्या आणि मुघलांच्या काळात वनवासी बांधवांना हेतुपुरस्सर समाजापासून तोडण्याचे षडयंत्र रचले गेले. भारताच्या स्वातंत्र्य युद्धात वनवासी बांधवांचे मोठे योगदान असल्याचे भरपूर दाखले आहेत. संपूर्ण वनवासी समाजाचे श्रद्धास्थान भगवान बिरसा मुंडा हे याचे प्रतीक आहेत. समस्त भारतवर्षात असे बरेच योद्धे देश आणि धर्म यासाठी लढलेले दिसेल!! आपण वरील विवेचनात वनवासी बांधवांचे समाजातील स्थान काय होते हे पाहिले.

राम कृष्ण आणि एकूणच संस्कृतीशी त्यांचे घट्ट नाते होते. आज राम आणि कृष्ण आणि अन्य देवदेवता तुमचे नाहीत तर तुम्ही रावणाचे वंशज आहात, रावण तुमचा देव आहे, राक्षस हे तुमचे आदर्श आहेत. आणि असे बरेच काही त्यांच्या माथी मारले जात आहे. दुर्दैवाने आजच्या घडीला या वनवासी मंडळींचा मुख्य समाजापासून असलेला दुरावा, या मंडळींचा भोळेपणा यामुळे या भ्रामक पण अत्यंत विघातक संकल्पना या समाजात रुजू लागल्या आहेत.. आणि यात काही कमी म्हणून की काय तर आता इतर दलीत आणि अनुसूचित जाती यांनासुद्धा या मूलनिवासी संकल्पनेत सामावून घ्यायचे उद्योग सुरू झाले आहेत!!

याला आणखीन एक तात्विक मुलामा द्यायचा प्रयत्न म्हणजे पर्यावरण संकल्पनेचा खुबीने वापर. या सर्व जनजाती या निसर्ग पूजक आहेत. निसर्गात ईश्वराचे स्वरूप पाहतात. याचा उपयोग करून घेऊन ते पर्यावरण पूरक जीवन जगतात आणि म्हणून इतर समाजापासून विशेषतः हिंदू समाजापासून वेगळे आहेत आणि त्यांचा धर्म वेगळा आहे हे रुजविण्याचा मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू आहे!! आदिवासींची दिशाभूल करणारे आज आपला धर्म, संस्कृती आणि आपली ओळख नष्ट करण्यात आघाडीवर आहेत, हेही आपण विसरता कामा नये. वनवासी समाजाला भारतापासून तोडण्यासाठी आंतरराष्ट्रीय शक्ती कार्यरत आहेत. मूलनिवासी दिन साजरा करण्यास प्रोत्साहन देणे हे देखील या दलांचे उद्दिष्ट आहे. या कटाचा या दिवसाशी काही संबंध नाही हे समजून घेतले पाहिजे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड यांसारख्या देशांतील मूळ रहिवाशांची जी स्थिती झाली ती भारतात कधीच झाली नाही. दुर्दैवाने वानवासी समाजाची दिशाभूल करून त्यांना इतर समाजाशी लढण्यासाठी प्रवृत्त करण्यात काही विदेशी शक्ती कार्यरत आहेत. त्यासाठी त्यांनी ९ ऑगस्टचा दिवस शस्त्रासारखा वापरला आहे.

चर्च तसेच चर्चप्रणित अनेक संस्था, डावी मंडळी, डीपस्टेट असा वर्ग उदयाला आला आहे तो, काँग्रेस सारखे सनातन संस्कृतीला आणि भारतीयत्वाला विरोध करणारे तथाकथित सेक्युलर पक्ष, शहरी नक्षल आणि यांना साथ देणारे विकाऊ पत्रकार आणि चॅनल्स यांच्या पुढाकाराने आदिवासी (मूलनिवासी) दिवस कार्यक्रम आणि त्यामागील मनोभूमिका तयार करण्याचे आणि वनवासी समाजाला तोडण्याचे मोठे षडयंत्र रचले आणि राबवले जात आहे. तुम्हा आम्हाला याचे वास्तव माहिती नसते आणि समजून घ्यायची इच्छाही नसते आणि त्यामुळे हा प्रश्न दिवसेंदिवस उग्र रूप धारण करत आहे.

जगातील काळ्या आणि गैर युरोपियन लोकांचे ख्रिस्तीकरण करण्याचा मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू आहे. यासाठी विकसनशील देशात बड्या युरोपिअन शक्ती कार्यरत आहेत. मानवतावादी कामाच्या बहाण्याने हे लोक येतात आणि धर्मांतराचे काम करतात. एव्हढेच नाही तर नवीन राष्ट्र निर्माणाचाही प्रयत्न करतात. संयुक्त राष्ट्र संघटना UNPO मानवी हक्क, ओळख आणि स्वतंत्र देशाची मागणी करणाऱ्या गटांना मदत पुरवते. भारतापासून वेगळ्या देशाची मागणी करणारी नागालँडची संघटना (नागालिम) UNPO ची सदस्य आहे. नॉर्वे आणि अनेक युरोपीय देश वांशिक आणि धार्मिक आधारावर नागांसाठी स्वतंत्र देशाची वकिली करत आहेत. अगदी आत्ता चर्चेत असणारे उदाहरण म्हणजे बांगलादेशच्या शेख हसीना यांनी ज्याचा उल्लेख केला ते. अमेरिकेने बांगलादेश आणि म्यानमार यातील काही प्रदेश तोडून वेगळे ख्रिश्चन राष्ट्र निर्माण करायला पाठिंबा द्या तर आम्ही तुम्हाला निवडणुकीत सहाय्य करू असा दिलेला प्रस्ताव!! सध्या भारतातील मणिपूर येथे कुकी आणि मैतेई संघर्ष आणि त्यात चर्च आणि पाश्चात्य राष्ट्रांची भूमिका!!

१९४७ मध्ये ब्रिटीशांनी भारताचे धार्मिक आधारावर दोन तुकडे केले. उर्वरित भारततही वनवासी बहुल पूर्वांचल हा भारतापासून वेगळा ठेवण्याचे यशस्वी प्रयत्न काँग्रेस आणि नेहरूंच्या मदतीने केले. धर्मांतराचे काम भरभरून केले आणि हा सर्व भाग भारतापासून तोडण्याचे आटोकाट प्रयत्न केले. संघ आणि संघप्रणीत संस्था आणि लष्कराची कणखर भूमिका यामुळे हे उद्देश सफल होऊ शकले नाहीत!! अजूनही हे प्रयत्न सुरूच आहेत. मणिपूर मधील हिंसाचार हा त्याचाच एक भाग!! भारतातील अंदाजे ७०५ आदिवासी जमातींपैकी मोठ्या संख्येने हिंदू धर्मापासून दूर जाण्याचे हेच कारण आहे का?

२०२१ साली जनगणना प्रस्तावित होती. कोरोना महामारी आणि लॉकडाऊनमुळे अजूनही ती झालेली नाही. या जनगणनेमध्ये आदिवासी समाजासाठी स्वतंत्र धर्म संहिता किंवा हिंदू धर्मापासून वेगळा धर्म असावा, जेणेकरून जागतिक स्तरावर हिंदूंची संख्या कमी करता येईल, या मागणीसाठी देश-विदेशातील अनेक संघटना संघर्ष करत आहेत. वनवासी बंधूंनी आपला धर्म हिंदू नाही असे नोंदवावे असा प्रयत्न मोठ्या प्रमाणात केला जात आहे. हे नवीन धर्म नंतर ख्रिश्चन मिशन संस्थांद्वारे ख्रिस्ती धर्मात मिसळले जावेत असा प्रयत्न करता येईल, ज्यामुळे धार्मिक अलिप्ततावादाला चालना मिळेल.

**-अरविंद जोशी**

# अवैध गौण खनिज वाहतुकीवर महसूल विभागाची कारवाई

## दोन डम्पर जप्त; चार लाख ७० हजारांचा दंड

**पेण : प्रतिनिधी**

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीला आळा घालण्यासाठी पेण महसूल विभागाने मुंबई-गोवा महामार्गावर धडक कारवाई करून क्रश सँडची अवैध वाहतूक करणारे दोन डम्पर जप्त केले. नियमांनुसार चार ब्रास वाहतुकीची परवानगी असताना तब्बल आठ ब्रास क्रश सँडची वाहतूक सुरू असल्याचे तपासणीत



आढळले.

याप्रकरणी संबंधित वाहनांवर चार लाख ७० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीविरोधात महसूल विभागाने कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली आहे. पेणचे तहसीलदार तानाजी शेजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाच्या पथकाने मुंबई-गोवा महामार्गावर विशेष तपासणी मोहीम राबविली. या मोहिमेदरम्यान एमएच ४७-बीवाय १२१० आणि एमएच ४६-बीयू ७३८१ या दोन डम्परमधून क्रश सँडची वाहतूक सुरू असल्याचे आढळून आले.

वाहनांची कागदपत्रे, ई-रॉयल्टी पास तसेच वाहतूक परवानगीची तपासणी करण्यात आली. यावेळी नियमानुसार चार ब्रास क्रश सँड वाहतुकीची परवानगी असताना प्रत्यक्षात तब्बल आठ ब्रास क्रश सँडची वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले. नियमांचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट होताच महसूल विभागाने दोन्ही डम्पर तत्काळ जप्त करून पुढील कारवाई सुरू केली. नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी पाचपट रॉयल्टीच्या निकषानुसार प्रत्येकी ७० हजार रुपयांचा दंड आकारला असून त्यासोबत प्रत्येकी दोन लाख रुपयांची अतिरिक्त दंडात्मक रक्कम ठोठावण्यात आली आहे. महसूल विभागाने दिलेल्या माहितीनुसार दोन्ही वाहनांवर मिळून चार लाख ७० हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

# नागोठण्यात पिकअपच्या धडकेत महिलेचा मृत्यू; चालकावर गुन्हा दाखल

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात पिकअप वाहनाने मोटारसायकलला मागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघात ५६ वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. अनिता अनंत जाधव असे मृत महिलेचे नाव असून या घटनेने नागोठणे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



आमडोशी, ता. रोहा येथील रहिवासी असलेले व सध्या नागोठणे सुप्रीम कॉलनी येथे राहणारे प्रविण अनंत जाधव हे आपली आई अनिता जाधव यांच्यासह नागोठणे बाजारपेठेत खरेदी करून मोटारसायकलवरून सुप्रीम कॉलनीकडे जात होते. त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वाघ मेडिकलसमोर त्यांच्या मोटारसायकलला मागून पिकअप क्रमांक एमएच ४३ सीओ २८६४ ने जोरदार धडक दिली. या धडकेत अनिता जाधव या मोटारसायकलवरून खाली पडल्या. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

अपघातानंतर उपस्थित नागरिकांनी त्यांना तत्काळ डॉ. कोकणे यांच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले, मात्र तपासणी केल्यानंतर डॉ. जी. जी. कोकणे यांनी त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. याप्रकरणी नागोठणे पोलिसांनी पिकअपचालक राजीव कुमार याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# रिलायन्स नागोठणेत दहशतवादी हल्ल्याचे मॉकड्रिल; सुरक्षा यंत्रणा सज्ज

**पाली : प्रतिनिधी**

रिलायन्स इंडस्ट्रीज, नागोठणे येथे नुकतेच लेव्हल-२ वास्तवदर्शी मॉकड्रिल घेण्यात आले. कंपनीच्या मटेरियल गेटमधून दोन सशस्त्र बंदूकधाऱ्यांनी सुरक्षा रक्षकांना घायाळ करून आर्पेट प्लांटमध्ये घुसखोरी केल्याच्या काल्पनिक परिस्थितीत कंपनी आणि पोलीस यंत्रणेच्या आपत्ती व्यवस्थापनाची कसोटी पाहण्यात आली.



कंपनीच्या मटेरियल गेटमधून दोन सशस्त्र अतिरेकी सुरक्षारक्षकांना घायाळ करून कंपनीच्या आर्पेट प्लांटमध्ये घुसले आहेत, अशी खबर मिळताच कंपनी सुरक्षा अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना सुरू केली. कंपनीच्या एसएसएम ऑफिसला सूचना मिळताच हेड एच.आर., कॉर्पोरेट अफेयर्स डिपार्टमेंट, सर्व डिपार्टमेंट हेड, फायर ब्रिगेड आणि फॅमिली वेल्फेअर सेंटरला त्वरित सतर्क करण्यात आले. कंपनीच्या आर.जी.एस.एस. सिक्युरिटी एजन्सीने मार्केटिंग बिल्डिंगच्या कंट्रोल रूमचा ताबा घेत पुढील कार्यवाहीच्या सूचना दिल्या. कॉर्पोरेट अफेयर्स डिपार्टमेंटकडून नागोठणे पोलीस स्टेशन, एसपी रायगड आंचल दलाल, डिवायएसपी रोहा प्रसाद गोकुळे, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग, प्रांताधिकारी कार्यालय रोहा व पेण, तसेच तहसीलदार रोहा व पेण यांना घटनेची माहिती देण्यात आली.नागोठणे पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांनी तातडीने क्विक रिस्पॉन्स टीम, आरसीपी, बॉम्ब डिटेक्शन अँड डिस्पोजल स्क्वाड, अँटी टेररिस्ट स्क्वाड रोहा डिव्हिजन व अँटी टेररिस्ट स्क्वाड मुंबई डिव्हिजन यांना पाचारण केले. कंट्रोल रूममधून अतिरेकी घुसलेली ठिकाणे संबंधित तुकड्यांना दाखवण्यात आली. आत घुसलेल्या अतिरेक्यांनी आर्पेट प्लांटच्या कंट्रोल रूमचा ताबा घेत तिथे तिघांना ओलीस ठेवले.

त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात स्फोटके असल्याचे गृहीत धरून पोलीस यंत्रणेने कारवाई केली. अखेर पोलिसांनी बंदी केलेल्या तिघांची सुटका केली आणि दोन्ही अतिरेक्यांना ताब्यात घेतले. कंट्रोल रूमच्या मॉनिटरवर या हालचालींची माहिती मिळत होती. मॉकड्रिलचे उद्दिष्ट पूर्ण झाल्यानंतर एसपी रायगड आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली डिवायएसपी प्रसाद गोकुळे यांनी समन्वय साधला. सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पोलीस तुकड्यांनी कामकाज चोखपणे पार पाडले. कंपनीच्या आरजीएस ग्रुपचे कर्नल गोपाल कृष्णन आणि अमित तायडे यांनी सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करून पोलिसांना सहकार्य केले. कॉर्पोरेट अफेयर्सचे अनिल डांगी आणि रमेश धनावडे यांनी पोलीस, महसूल विभाग, पत्रकार व इतर सरकारी यंत्रणांना मिनिट टू मिनिट माहिती दिली. एच.एस.एफ. डिपार्टमेंटचे सचिन भागवत आणि निलेश दांडेकर यांनी फायर ब्रिगेड व अॅम्बुलन्स सेवेचे व्यवस्थापन पाहिले.

मॉकड्रिलच्या यशस्वीतेसाठी कौशिक चक्रवर्ती, कर्नल गोपाल कृष्णन, अमित तायडे, कैलाशनाथ महाडिक, अनिल डांगी, रमेश धनावडे, निलेश दांडेकर, संजय कांबडी, सुनील चौधरी, रोहिताश शर्मा, अजिंक्य पाटील व त्यांच्या संपूर्ण टीमने परिश्रम घेतले.

# माणगाव महाविद्यालयात 'थॅलेसेमियामुक्त महाराष्ट्र' जनजागृती अभियान

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग. तटकरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि जनकल्याण रक्तपेढी, महाड यांच्या संयुक्त विद्यमाने 'थॅलेसेमियामुक्त महाराष्ट्र' जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानाचे आयोजन माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयशंकर पांडेय होते. या अभियानामध्ये अविनाश अशोक घोलप, सिकल सेल व थॅलेसेमिया प्रकल्प रायगड जिल्हा समन्वयक यांनी थॅलेसेमिया या आजाराची लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपाय याविषयी मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात घोलप म्हणाले की, थॅलेसेमिया हा रक्ताशी संबंधित एक गंभीर अनुवंशिक आजार आहे. यात रक्तातील हिमोग्लोबिन कमी प्रमाणात तयार होते. या आजाराचे मायनर आणि मेजर असे दोन मुख्य प्रकार आहेत. थॅलेसेमिया मायनर असलेल्या व्यक्ती पूर्णपणे निरोगी जीवन जगतात, मात्र ते याचे वाहक असतात. जर आई आणि वडील दोघेही मायनर असतील तर होणाऱ्या बालकाला थॅलेसेमिया मेजर होण्याचा धोका असतो. सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये थॅलेसेमिया या आजाराची मोफत रक्त तपासणी केली जाते.

हा आजार रोखण्यासाठी लग्नापूर्वी तरुण-तरुणींनी थॅलेसेमिया मायनरची तपासणी आवर्जून करावी. गर्भवती महिलांनी डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य ती रक्त तपासणी करावी. समाजात या आजाराविषयीचे गैरसमज दूर करून जागरूकता वाढवावी, असे आवाहन त्यांनी केले. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. राजेंद्र आचार्य यांनी मानवी जीवनातील आरोग्याचे महत्त्व विशद केले. थॅलेसेमिया हा आजार अतिशय गंभीर असून त्याचे प्रमाण आज जरी कमी असले तरी कुटुंबाची आर्थिक घडी विस्कटून टाकणारा महागडा आजार आहे. त्यामुळे थॅलेसेमिया मायनरची तपासणी आवश्यक आहे. त्यासाठी ठिकठिकाणी थॅलेसेमिया तपासणी शिबिरांचे आयोजन करणे गरजेचे आहे. अशा रुग्णांना दर २१ दिवसांच्या अंतराने रक्त बदलणे अनिवार्य असते. तसेच रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असल्यामुळे या प्रकारच्या रुग्णांच्या मदतीसाठी युवकांनी दरवर्षी रक्तदान केले पाहिजे. प्रत्येकाला आपला स्वतःचा रक्तगट माहिती असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.



# खाऊचे पैसे वाचवून आदिवासी बांधवांना मदत; कार्मेलच्या विद्यार्थ्यांचा स्तुत्य उपक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

कार्मेल कॉन्व्हेंट स्कूल, खोपोलीच्या स्काऊट अँड गाईड तुकडीने खोपोली शहरातील लौजी गावात आयोजित केलेल्या समाजसेवा, पर्यावरण संवर्धन आणि वर्षा सहलीच्या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला. तब्बल १६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतःच्या खाऊसाठी मिळणारे पैसे वाचवून आदिवासी कुटुंबांसाठी गृहपयोगी साहित्य खरेदी करून त्याचे वितरण केले.



विद्यार्थ्यांच्या या संवेदनशील कृतीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. लौजी गावच्या निसर्गरम्य परिसरात आयोजित वर्षा सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी शिस्त, सांघिक भावना आणि निसर्गप्रेमाचा अनुभव घेतला. त्यानंतर लौजी गावातील आदिवासी बांधवांना आवश्यक गृहपयोगी साहित्य तसेच विद्यार्थ्यांनी स्वतःच्या घरातून संकलित केलेले वापरण्यायोग्य कपडे वितरित करण्यात आले. 'सेवा हीच खरी साधना' या भावनेतून विद्यार्थ्यांनी केलेला हा उपक्रम उपस्थितांच्या मनाला स्पर्शून गेला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत सॅनियो स्पेशल स्टील कंपनीच्या (मस्को) सहकार्याने उपलब्ध झालेल्या फळ-फुलझाडे तसेच विविध देशी वृक्षांच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले.

"एक पेट्रोल - एक वृक्ष" हा संदेश देत विद्यार्थ्यांनी पर्यावरणाशी असलेले आपले नाते अधिक दृढ करण्याचा संकल्प केला. या उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी लौजी गावातील इतिहास प्रसिद्ध विहिरीलाही भेट दिली. विहिरीच्या ऐतिहासिक वारशाची माहिती जाणून घेत विद्यार्थ्यांनी स्थानिक इतिहास, जलसंवर्धन आणि पारंपरिक जलव्यवस्थापनाचे महत्त्व समजून घेतले. कार्यक्रमासाठी हेल्प फाउंडेशन, खोपोलीचे संस्थापक गुरुनाथ साठेलकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या समाजाभिमुख विचारांचे कौतुक करत "समाजसेवा, पर्यावरण संरक्षण आणि संवेदनशीलता हीच खऱ्या अर्थाने शिक्षणाची ओळख आहे. अशा उपक्रमांमधूनच देशाला जबाबदार आणि सुजाण नागरिक मिळतात," असे प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

यावेळी कार्मेल कॉन्व्हेंट स्कूलच्या मुख्याध्यापिका सिस्टर निर्मल मारिया, लौजी ग्रामस्थ किशोर पाटील, अरुण पाटील, राम पाटील, जनता विद्यालय, लव्हेजच्या मुख्याध्यापिका संगीता पवार, ग्रामस्थ तसेच आदिवासी भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. मुख्याध्यापिका सिस्टर निर्मल मारिया यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्काऊट मास्टर संदीप साळुंखे, सिस्टर सिमी, रेश्मा जाधव, जयसिंथा आणि समीर शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# गटारीसाठी माथेरान हाऊसफुल्ल; मुंबई-पुण्याहून मोठी गर्दी

**माथेरान : बातमीदार**

गटारी अमावास्या आठवड्याच्या मधल्या दिवशी आल्याने या विकेंडला मुंबई, पुणे, गुजरात आणि केरळमधील पर्यटक माथेरानमध्ये मोठ्या प्रमाणात दाखल झाले आहेत. दस्तुरी नाका, रिक्षा स्टँड आणि अमन लॉज स्टेशन या परिसरात पर्यटकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.

प्रदूषणमुक्त पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानला या विकेंडला गटारी साजरी करण्यासाठी पर्यटकांनी विशेष गर्दी केली आहे. यंदा गटारी अमावास्या बुधवारी आल्याने अनेकांनी विकेंडचा बेत आखला आहे. गटारी म्हटली की खवय्यांसमोर चमचमीत मांसाहार आणि मद्याचा बेत आधी डोळ्यांसमोर येत असतो. श्रावण महिन्यात मांसाहार वर्ज्य असल्याने गटारीला विशेष महत्त्व असते.

याच कारणामुळे मुंबई आणि पुण्यातील हौशी नोकरदार वर्गाने थंड हवेच्या आणि प्रदूषणमुक्त माथेरानलाच यावर्षीदेखील आपले प्राधान्य दिले आहे. पर्यटकांच्या मोठ्या गर्दीमुळे नेरळ-माथेरान घाट रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसून येत आहे. दरम्यान, काही टॅक्सीचालक माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांना थोड्या अंतरावर सोडून पायी जाण्याचा सल्ला देत आहेत. पर्यटकांना मनसोक्त भिजण्याचा आनंद मिळावा यासाठी पावसानेदेखील अधूनमधून आपली हजेरी लावली आहे.

शारलोट तलावाजवळील सुरक्षित धबधब्याखाली पर्यटक भिजताना दिसून येत आहेत. तसेच माथेरानमधील अनेक मांसाहारी रेस्टॉरंटवरदेखील खवय्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून येत आहे. माथेरानमधील सर्व हॉटेल्स आणि लॉजेसदेखील या कालावधीत पूर्ण क्षमतेने हाऊसफुल्ल झाले आहेत. थोडक्यात पावसाळी पर्यटन माथेरानमधील व्यावसायिकांसाठी आणि इतर लहान मोठ्या विक्रेत्यांसाठी यंदा फायदेशीर ठरताना दिसत आहे.





## जाहिर नोटीस

याद्वारे सूचित करण्यात येते की, 'सुयोग दीप को-ऑप. हाउसिंग सोसायटी लि.' (पत्ताः प्लॉट क्र. ४०+४१, सेक्टर ५ए, न्यू पनवेल पूर्व ४१०२१०) येथील श्री. राजेश वसंत वाणी यांच्या नावे असलेले शेअर प्रमाणपत्र क्र. ००६ (ज्याचे विशिष्ट क्रमांक ०२६ ते ०३० आहेत) हरवल्याचे/गहाळ झाल्याचे कळवण्यात आले आहे आणि त्यांनी डुप्लिकेट (दुय्यम) शेअर प्रमाणपत्र मिळण्याबाबत सोसायटीकडे अर्ज केला आहे.

ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीत, डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्र जारी करण्याबाबत काही दावे किंवा आक्षेप असल्यास ते लेखी स्वरूपात सादर करण्याचे आवाहन सोसायटीतर्फे करण्यात येत आहे. या कालावधीत कोणतेही दावे किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, सोसायटी डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्र जारी करण्यास मोकळी असेल.

'सुयोग दीप को-ऑप. हाउसिंग सोसायटी लि.' यांच्या वतीने व करिता,

**स्थळ: न्यू पनवेल**

**सही/-**
अॅड. प्रमोदिनी प्रकाश सावंत
पद्मावती सोसायटी ऑफिस नं -००१
नित्यानंद मार्ग जुने पनवेल-४१०२०६

## नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, मोटार वाहन क्र. MH-46-CP8315 चे मालक **कुरेश जोहर सेवालियावाला** यांचे तारीख १२/०५/२०२६ रोजी निधन झालेले आहे.

मी जोहर अब्दुल्लाभाई सेवालीयावाला-२०६ साई समर्थ ब्लेसिंग्ज सीएचएस लि,मिरची गल्ली पनवेल, जि. रायगड ४१०२०६ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - जोहर अब्दुल्लाभाई सेवालीयावाला**
**पत्ता- २०६ साई समर्थ ब्लेसिंग्ज सीएचएस लि,मिरची गल्ली पनवेल, जि. रायगड ४१०२०६**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे- निताळे ता- पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन -**

**मौजेः निताळे, तालुका- पनवेल,जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| निताळे | अब्दुल रऊफ इस्माईल शेख रा. वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड | १८/२ | ०.११.२० <br> ००.००.२० <br> ०.११.४० | २.३७ |
| | | १८/३ | ०.१५.४० <br> ०.०१.०० <br> ०.१६.४० | ३.२५ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीत न येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांक: ०८/०८/२०२६**

**सही/-**
**अॅड. सरिता महेंन्द्र साखरे**
**पत्ता- बंन्सल असोसिएट्स, पहिला मजला प्लॉट नं.३०, सेक्टर १/२, रोड नं.४ नविन पनवेल, बालाजी मंदिरच्या समोर ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६.**

# नगरसेवकांच्या सूचनांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष; सानपाड्यात गटारावरील स्लॅब कोसळला

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा – पामबीच मधील सेक्टर १९ येथील रस्त्यालगतच्या सिडकोकालीन निर्मित असलेल्या भूमिगत गटारावरील स्लॅब गुरुवारी अचानक कोसळला. मुख्य म्हणजे हा ही गटार पेट्रोलपंपला लागून आहे. पेट्रोलपंपमध्ये पेट्रोल व डिझेल भरण्यासाठी शेकडो वाहने दररोज येत असतात. अनेकदा वाहनांची रांग लागलेली असते.रांगेतील वाहने गटारावर देखील उभी असतात. याच गटारावरील स्लॅब कोसळल्याने गोंधळ उडाला. सुदैवाने त्याचवेळी कोणतेही वाहन व नागरिक त्या जागी नसल्याने जीवितहानीचा धोका टळला.

स्थानिक लोकप्रतिनिधिंनीं अभियंता विभागास अनेकदा कळवून देखील, त्यावर पालिकेकडून कोणत्याही उपाययोजना केल्या गेल्या नव्हत्या. या दुर्लक्षामुळेच गटारावरील स्लॅबचा मोठा भाग कोसळल्याचा



आरोप उपमहापौर दशरथ भगत यांनी केला आहे.याच सिडकोकालीन गटारावरील धोकादायक स्लॅब बाबतीत वारंवार स्थानिक लोकप्रतिनिधिंकडून विकास व दुरुस्ती कामांबाबतीतील सूचनांकडे कानाडोळा करणारे महापालिका प्रशासनच जबाबदार असल्याचे स्थानिक नगरसेवक व उपमहापौर दशरथ भगत यांनी म्हटले आहे.

साडेपाच वर्षांहुन अधिक कालावधीचा प्रशासकीय कालावधी नंतर फेब्रुवारी २०२६ मध्ये नवी मुंबई महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक झाली. या निवडणुकीत

> **जनतेने कौल दिलेल्या नगरसेवकांनी सुचविलेल्या सूचना आणि विकास व सुधार कामांच्या पत्रांना पालिका प्रशासनाने गांभीर्याने घेवून वेळेत सोयीसुविधा द्याव्यात जेणेकरून जीवितहानी किंवा दुर्घटना घडणार नाहीत.**
>
> **– दशरथ भगत, उपमहापौर नवी मुंबई महापालिका**

नवी मुंबईतील जनतेने पॅनल पद्धतीने निवडून दिलेल्या अ, ब, क, आणि ड प्रभागनिहाय लोकप्रतिनिधी यांनी प्रभागात विविध विकास कामांची आश्वासने मतदारांना दिलेली आहेत.ज्यामुळे प्रभागातील रस्ते, पदपथ, गटारे – नाले, उद्याने, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य सेवासुविधा, सामाजिक वापरांच्या वास्तू, आरक्षित भूखंडांवरील विकास, विविध समाज व घटकांच्या लाभासाठी सहाय्यक योजना आदी लोकाभिमुख कामे करणे बांधील आहेत.

मात्र नवी मुंबई महापालिकेत लोकशाही मार्गाने नगरसेवक – नगरसेविका येऊन देखील पालिका प्रशासन अद्यापही प्रशासकीय राजवटीतुन बाहेर आलेले नाही अशी स्थिती आहे. अनेक लोकप्रतिनिधिंनी आपआपल्या प्रभागातील विकास, सुधार व दुरुस्ती याबाबतीतील कामांसंदर्भात पत्राद्वारे सुचविलेल्या नागरी कामांकडे प्रशासकीय काळातील कार्यपद्धतीमुळे अधिकारी कानाडोळा करीत आहेत का? असा प्रश्न पडू लागला आहे.अनेक कामांमध्ये सुरक्षितता राखली जात नसल्याने शहरातील नागरिकांच्या जीवितास हानी पोहचली आहे. अश्या अनेक ठिकाणी संभाव्य घटना घडण्याची शक्यता आहे.

## नवी मुंबई विमानतळावर ऑटो पिकअप झोनमध्ये उबर ऑटो सेवेचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दि. बा पाटील नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट येथे प्रवाशांच्या सुविधेत आणखी भर पडली असून विमानतळाच्या ऑटो पिकअप झोनमध्ये उबर ऑटो सेवा अधिकृतपणे सुरू करण्यात आली आहे. या नव्या सुविधेमुळे विमानतळावर येणाऱ्या तसेच विमानतळावरून पुढील प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सुरक्षित, जलद आणि सुलभ वाहतुकीचा आणखी एक पर्याय उपलब्ध झाला आहे.

सध्या उबर ऑटो सेवा दररोज सकाळी ६.०० ते मध्यरात्रीनंतर १.३० वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहे. प्रवाशांचा प्रतिसाद, मागणी आणि सेवा संचालनाचा आढावा घेऊन भविष्यात ही सेवा २४ तास सुरू करण्याचाही विचार करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.




नवी मुंबई विमानतळावर यापूर्वीच उबर, ओला, रॅपिडो, अॅलाइट, ऑल माइल्स, एअरलिंक, डब्ल्यूटीआय तसेच इतर सेवा पुरवठादारांकडून मध्यरात्री १२ वाजेपर्यंत कॅब सेवा उपलब्ध आहे. त्याचबरोबर तंत्रज्ञानाधारित भारत टॅक्सी या प्रीपेड टॅक्सी सेवेचाही नुकताच शुभारंभ करण्यात आला आहे.

विमानतळावरील वाहतूक सेवा अधिक सक्षम आणि प्रवासी–केंद्रित करण्याच्या दृष्टीने उबर ऑटो सेवेची भर महत्त्वाची मानली जात आहे. या सुविधेमुळे प्रवाशांना त्यांच्या गंतव्यस्थानी पोहोचण्यासाठी अधिक किफायतशीर आणि सहज उपलब्ध पर्याय मिळणार असून विमानतळावरील वाहतूक व्यवस्थेलाही अधिक बळ मिळणार आहे.

## जुईनगर येथे 'भावना ग्रुप'तर्फे वृक्षारोपण सोहळा

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी, 'भावना ग्रुप'च्या वतीने दरवर्षीप्रमाणे जुईनगर येथे अत्यंत उत्साहात वृक्षारोपण सोहळा संपन्न झाला.

भावना ग्रुप नेहमीच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेण्यात अग्रेसर असतो. हा संपूर्ण सोहळा संस्थापिका आणि मार्गदर्शिका अपर्णा राजेश शहा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे, या पर्यावरणपूरक कार्यात प्रत्येकाला आपल्या कर्माचे फळ आणि पुण्यातील सहभाग लाभावा, यासाठी सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्या इच्छेनुसार उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याची संधी देण्यात आली.

यावेळी उपक्रमाच्या उद्देशावर प्रकाश टाकताना आयोजकांनी सांगितले की, "निसर्गाने आपणास जे भरभरून दिले आहे, त्याची परतफेड करणे आपल्या हातात नाही; परंतु नवीन वृक्षे लावून आणि त्यांचे संगोपन करून आपण निसर्गाचे आभार नक्कीच मानू शकतो. या हेतूने प्रेरित होऊन सर्व कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहात रोपांची लागवड केली. निसर्गाचे आभार मानताना उपस्थितांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच व समाधानकारक नैसर्गिक आनंद झळकत होता. भावना ग्रुपचा हा स्तुत्य उपक्रम परिसरातील नागरिकांसाठीही कौतुकाचा विषय ठरला आहे.

## सुरंगीच्या सुगंधाने निसर्गोद्यान दरवळणार | महापौर, आयुक्त आणि मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

सध्याची वातावरणाची स्थिती पाहता पर्यावरण संरक्षण व संवर्धनाला पर्याय नाही हे लक्षात घेत योग्य प्रकारे झाडे लावणे आणि त्यांचे संवर्धन करणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सांगत नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी नागरिकांना यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी 'हरित प्रभाग' अर्थात 'ग्रीन वॉर्ड' स्पर्धा राबविण्याची संकल्पना जाहीर केली. या पर्यावरणपूरक वृक्षारोपण संवर्धन अभियानात सर्व प्रकारच्या संस्था, मंडळे, नागरिक यांनी आपले भविष्य सुरक्षित करण्यासाठी स्वयंस्फुर्तीने सहभागी व्हावे असेही आवाहन महापौरांनी केले.

नवी मुंबई महानगरपालिका उद्यान विभागाच्यावतीने सेक्टर १४ कोपरखैरणे येथील निसर्गोद्यानामध्ये 'माझी वसुंधरा अभियान ७.०' अंतर्गत



'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाच्या अनुषंगाने आयोजित वृक्षारोपण समारंभप्रसंगी त्या उपस्थितांशी संवाद साधत होत्या.यावेळी महापौर सुजाता पाटील, आयुक्त डॉ.कैलास शिंदे, प्रभाग समिती अध्यक्ष चंद्रभागा मोरे, आरोग्य समिती सभापती डॉ.जयाजी नाथ, पाणीपुरवठा समिती सभापती रविकांत पाटील, विधी समिती सभापती अॅड.सायली शिंदे, नगरसेवक संदीप म्हात्रे, डी.आर.पाटील, नगरसेविका अॅड.भारती पाटील, दिक्षा कचरे, मिनाक्षी पाटील, शाळा – महाविद्यालयांचे मुख्याध्यापक शिक्षक विद्यार्थी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी पर्यावरणाचा हास रोखण्यासाठी सर्वांनी मिळून जागरूकतेने प्रयत्न करण्याची गरज विषद करीत ही आपल्या अस्तित्वाची लढाई असल्याचे सांगितले. विकास हा पर्यावरणाची काळजी घेऊनच व्हायला हवा हे स्पष्ट करीत नवी मुंबई क्षेत्रात होणारी वृक्षलागवड ही जैवविविधतेला नजरेसमोर ठेवून प्राधान्याने देशी प्रजातीच्या झाडांचीच होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केलेय

नवी मुंबई महानगरपालिकेस पर्यावरण विषयक कामात सहकार्य करणा–या संस्थांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाल. सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये सुरंगी वृक्षरोपे पुरवठा करणारे ऑरम फाऊंडेशन, कॉन्सर्टो प्रा.लि.महापे, डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा अलिबाग, श्री आदिशक्ती निर्मलादेवी संस्था कोपरखैरणे, संत धन निरंकारी मंडळ कोपरखैरणे, श्रीविठ्ठल रखुमाई भजनी मंडळ कोपरखैरणे, मोरया सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळ कोपरखैरणे, ज्ञानविकास संस्था कोपरखैरणे, क्राईस्ट अकॅडमी स्कुल सेक्टर २३ कोपरखैरणे, नमुंमपा शाळा क्र. ३६ कोपरखैरणेगाव, सुनिल किंद्रे युवा फाऊंडेशन या सहयोगी संस्थेच्या पदाधिका–यांना सन्मानीत करण्यात आले.

यावेळी विशेषत्वाने कर्नाटक राज्यातून आणलेल्या सुरंगी झाडाच्या ४ ते ५ फूट वाढलेल्या २०० वृक्षरोपांची निसर्गोद्यानात मान्यवर व नागरिकांच्या हस्ते लागवड करण्यात आली. सुरंगी हे मध्यम आकाराचे सुगंधी फुलांचे सदाहरित झाड प्रामुख्याने त्याच्या लोभस सुगंधासाठी व फुलांच्या अनोख्या रचनेसाठी ओळखले जाते. या वृक्षारोपणामुळे निसर्गोद्यानातील हा पट्टा सुरंगीच्या सुगंधाने आसमंत दरवळून टाकणार आहे.

## गव्हाण-कोपर विद्यालयात नशामुक्ती अभियान

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

भारत सरकार आणि प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय यांच्या संयुक्तविद्यमाने नशामुक्ती अभियानांतर्गत विशेष जनजागृती कार्यक्रम शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट रोजी रयतशिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण–कोपर येथेउत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमास प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या कार्यकर्त्या व व्याख्यात्या ब्रह्माकुमारी प्रीतीदीदी आणि ब्रह्माकुमारी शिल्पादीदी उपस्थित होत्या. तसेच शिवम चॅरिटेबल ट्रस्टच्यामॅनेजिंग ट्रस्टी विभूती सुर्वे व त्यांचे यजमान विष्णू सुर्वे यांचीही विशेष उपस्थिती लाभली.विद्यालयाच्या प्राचार्या सौ ज्योत्स्ना ठाकूर मॅडम, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व ज्येष्ठ शिक्षक रवींद्र भोईर,उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका शशिकला पाटील, ज्येष्ठ शिक्षक व संस्थेचे लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे यांच्या शुभहस्ते आलेल्या सर्वमार्गदर्शकाचे स्वागत करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ब्रह्माकुमारी प्रीतीदीदी यांनीमनुष्य आणि प्राणी यांच्यातील फरक स्पष्ट करताना विवेक, विचारशक्ती आणि आत्मसंयम ही माणसाचीखरी ओळख असल्याचे सांगितले. विविध कथानकांच्या माध्यमातून व्यसनाधीनतेचे व्यक्ती, कुटुंब आणिसमाजावर होणारे दुष्परिणाम त्यांनी विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे मांडले. तसेच चंद्रगुप्त मौर्य आणि आचार्यचाणक्य यांच्या कथेतून गुरु–शिष्य नात्याचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांनी चांगले संस्कार, योग्य मार्गदर्शन आणि सकारात्मक विचार स्वीकारण्याचे आवाहन केले.

या प्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना नशामुक्तीची सामूहिक शपथ देण्यात आली. व्यसनांपासून दूरराहण्याचा तसेच आपल्या कुटुंबात, मित्रपरिवारात आणि समाजात नशामुक्तीचा संदेश पोहोचविण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. या सामूहिक शपथेमुळे कार्यक्रमाला विशेष सामाजिक आणि प्रेरणादायी स्वरूपप्राप्त झाले.

कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्ती, आत्मसंयम, सकारात्मक जीवनशैली आणिसामाजिक जबाबदारी याबाबत प्रभावी जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व इयत्ता पाचवी ते दहावी अखेर सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ हर्षला पाटील यांनी केले."नशेला नकार, जीवनालाहोकार; नशामुक्त भारतासाठी प्रत्येकाचा सहभाग आवश्यक!" या प्रेरणादायी संदेशाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## बालाजी सिम्फनी सोसायटीच्या अध्यक्षपदी यतिन पाटील बिनविरोध



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बालाजी सिम्फनी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्षपदी भाजप ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस यतिन पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. पार पडलेल्या निवडणूक प्रक्रियेत सभासदांनी त्यांच्या नेतृत्वावर व कार्यक्षमतेवर विश्वास व्यक्त करीत त्यांची एकमताने निवड केली. यावेळी संस्थेच्या नव्या कार्यकारिणीचीही निवड करण्यात आली. वैभव पाटील यांची सचिव, तर मच्छिंद्रनाथ गोऱ्हे यांची खजिनदार म्हणून निवड झाली.

यतिन पाटील यांनी सर्व सभासदांचे आभार मानत संस्थेचा कारभार अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि विकासाभिमुख करण्याचा निर्धार व्यक्त केला. सोसायटीतील मूलभूत सुविधा, सुरक्षा, स्वच्छता, सौंदर्यीकरण तसेच सभासदांच्या हिताला प्राधान्य देत सर्वांच्या सहकार्याने संस्थेची प्रगती साधण्याचा प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले. यतिन पाटील यांच्या बिनविरोध निवडीबद्दल तसेच नवनिर्वाचित कार्यकारिणीचे सोसायटीतील रहिवासी, सभासद आणि हितचिंतकांकडून अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची प्रगती अधिक वेगाने होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## जीवन व ध्यान तसेच मानसिक आरोग्य जनजागृतीवर कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, नवीन पनवेल यांच्या एनएसएस युनिटतर्फे दत्तक घेतलेल्या गावातील महिलांसाठी ८ ऑगस्ट रोजी "जीवन व ध्यान" तसेच मानसिक आरोग्य जनजागृतीवर आधारित क्षेत्राधारित सामुदायिक सेवा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश ग्रामीण महिलांमध्ये मानसिक आरोग्य, तणाव व्यवस्थापन, ध्यान, श्वसन तंत्र, मनःशांती आणि निरोगी जीवनशैली याबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता.



कार्यक्रमाचे मार्गदर्शन डॉ. पंकज म्हात्रे यांनी केले. त्यांनी सहभागी महिलांना दैनंदिन जीवनात सहज करता येणाऱ्या सोप्या ध्यान व श्वसन तंत्रांचे मार्गदर्शन केले तसेच त्यांचा प्रत्यक्ष सराव करून घेतला. तणाव कमी करणे, मन एकाग्र ठेवणे आणि काम, कौटुंबिक जबाबदाऱ्या व वैयक्तिक जीवनामध्ये संतुलन राखण्याचे महत्त्व यावर संवादात्मक चर्चा करण्यात आली. सहभागी महिलांना नियमित ध्यान व श्वसनाचा सराव करून मानसिक शांतता व सकारात्मक जीवनशैली अंगीकारण्यास प्रोत्साहित करण्यात आले.

या कार्यक्रमात एकूण ५० ग्रामीण महिलांनी सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमामुळे सहभागी महिलांमध्ये मानसिक आरोग्य, ध्यान, तणाव व्यवस्थापन आणि निरोगी जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण झाली. तसेच NSS युनिट आणि स्थानिक ग्रामीण समुदायामधील संबंध अधिक दृढ होण्यास मदत झाली. हा कार्यक्रम डॉ. आशिष जैन, प्राचार्य, धनराज विसपुते, अध्यक्ष आणि संगीता विसपुते, सचिव, आदर्श ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे आयोजित करण्यात आला.

## गव्हाण विद्यालयात ड्रग्ज फ्री इंडिया २०२८चा संकल्प

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

केंद्र सरकारच्या 'भारत नशामुक्त' अभियानांतर्गत 'ड्रग फ्री इंडिया २०२८' या संकल्पनेवर आधारित नशामुक्ती जनजागृती व समुपदेशन कार्यक्रम रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय,गव्हाण व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज येथे शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट रोजी उत्साहात संपन्न झाला.

उलवे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन रजाने यांच्या मार्गदर्शनाखाली ज्युनिअर कॉलेजमधील इयत्ता अकरावी व बारावी कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी या विशेष समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार बच्छाव यांनी अभ्यासपूर्ण माहिती, प्रभावी संवाद आणि



पी.पी.टी. सादरीकरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचेदुष्परिणाम व नशामुक्त जीवनाचे महत्त्व पटवून दिले. मार्गदर्शन करताना तुषार बच्छाव यांनी अमलीपदार्थ म्हणजे व्यक्तीच्या मेंदूवर व शरीरावर परिणाम करून व्यसन निर्माण करणारे पदार्थ असल्याचे स्पष्ट केले.

विद्यार्थी व्यसनाच्या आहारी का जातात, अमली पदार्थांचेशारीरिक, मानसिक व सामाजिकदुष्परिणाम, व्यसनाची प्राथमिक लक्षणे तसेच व्यसनामुळे होणारे कायदेशीर परिणाम याबाबत त्यांनीविद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. NDPS Act, १९८५ मधील तरतुदींचीही त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती करून दिली. सोशल मीडियाच्या अयोग्य वापरामुळे होणारे परिणाम, चुकीच्या संगतीपासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. एखादी संशयास्पद बाब निदर्शनास आल्यास ती लपवून न ठेवता त्वरित शिक्षक, पालक किंवा पोलिसांना माहिती द्यावी, असेही त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने चारित्र्य प्रमाणपत्राचे महत्त्व स्पष्ट करताना एखाद्या गुन्ह्यात अडकण्यामुळे पुढीलशिक्षण व भविष्यातील संधींवर परिणाम होऊ शकतो, याची जाणीव त्यांनी विद्यार्थ्यांना करून दिली.'ड्रग फ्री इंडिया २०२८' अभियान अधिक प्रभावी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी पोस्टर, रील व बॅनर निर्मिती स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहनही करण्यात आले. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार बच्छाव यांनी दिली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयातील विद्यार्थ्यांना नशामुक्तीची सामूहिक शपथ देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक लाइफ वर्कर डी. के. म्हात्रे यांनी केले.याप्रसंगी उलवे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अर्जुन रजाने, पोलीस निरीक्षक पी. एस.निघोट, सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार बच्छाव, पोलीस शिपाई विश्वनाथ पाटील, विद्यालयाच्या प्राचार्यासौ. जे. एस. ठाकूर, उपमुख्याध्यापक श्री. विलास लेंभे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्यश्री. रविंद्र भोईर, पर्यवेक्षिका शशिकला पाटील मॅडम,लाइफ वर्कर डी. के. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख श्री. संजय उगले तसेच ज्युनिअर कॉलेजचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थितहोते."नशेला नकार, उज्ज्वल भविष्याला होकार; ड्रग फ्री इंडिया २०२८ साठी विद्यार्थ्यांचा निर्धार!" या संदेशाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## एम. एन. एम. विद्यालयातील विद्यार्थ्यांचा जिओ इन्स्टिट्यूटला शैक्षणिक अभ्यास दौरा

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.एन.एम. विद्यालय व टी.एन.जी. कनिष्ठ विज्ञान विद्यालय, गव्हाण–कोपर येथील इयत्ता दहावी, अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी जिओ




इन्स्टिट्यूट, उलवे येथे शैक्षणिक अभ्यासदौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या अभ्यासदौऱ्याचा उद्देश विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक वातावरण, अत्याधुनिक सुविधा, संशोधनाधिष्ठित शिक्षणपद्धती आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक संधींची प्रत्यक्ष ओळख करून देणे हा होता. या भेटीद्वारे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन मिळाले तसेच संस्थेच्या शैक्षणिक कार्यपद्धतीचा अनुभव घेण्याची संधी लाभली.

या अभ्यासदौऱ्यास शाळेच्या प्राचार्या सायली वडवलकर, पर्यवेक्षिका प्रणिता गोले, यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता दहावी ते बारावीमध्ये अध्यापन करणारे सर्व शिक्षक विद्यार्थ्यांसोबत उपस्थित होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध विभागांची माहिती समजावून सांगत संपूर्ण भेटीदरम्यान योग्य मार्गदर्शन केले.

या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडून त्यांच्या उच्च शिक्षणाविषयीची उत्सुकता अधिक वाढली. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण सहभाग नोंदवत संस्थेच्या उपक्रमाला यशस्वी प्रतिसाद दिला.

# आदिवासी समाजाची वास्तू चालती बोलती असावी -खासदार तटकरे

**माणगाव : प्रतिनिधी**

आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी उद्याच्या भवितव्याच्या दृष्टीने वेगवेगळे कार्यक्रम होऊन माणगावमधील आदिवासी समाजाची हि वास्तू चालती बोलती असावी असे प्रतिपादन खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केले. खासदारांचा स्थानिक विकास निधी अंतर्गत बांधण्यात आलेल्याला माणगाव तालुका आदिवासी भवनाचा लोकार्पण सोहळा शनिवार दि.८ ऑगस्ट रोजी त्यांच्या हस्ते व राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.



या कार्यक्रमास जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे,तालुकाध्यक्ष काका नवगणे,जेष्ठ नेते शेखर शेठ देशमुख,पक्षाचे नेते आनंद यादव,गजानन अधिकारी,राजिप सदस्या दिशा जाधव,जिल्हा युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष शादाब गैबी,माणगाव पंचायत समिती उपसभापती मनीषा मालोरे,नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे,पंचायत समिती सदस्या संगीता बक्कम,पंचायत समिती सदस्य अक्षय जाधव,उपनगराध्यक्ष रिया उभारे,माजी पंचायत समिती सदस्य शैलेश भोनकर,माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे,संदीप खरंगटे ,स्थानिक नगरसेवक दिनेश रातवडकर,नगरसेविका लक्ष्मी हिलम,पक्षाचे तालुका सरचिटणीस राजेंद्र शिर्के,कार्याध्यक्ष अँड.सुशील दसवते,राष्ट्रवादीचे माणगाव शहराध्यक्ष सुनील पवार,स्वीकृत नगरसेवक विठोबा पालकर,माजी नगरसेवक जयंत बोडेरे,युवानेते सिद्धांत देसाई,आदिवासी समाजाचे नेते रमेश कोळी आदी मान्यवरांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी - कार्यकर्ते,आदिवासी संघटना माणगाव तालुका पदाधिकारी,कार्यकर्ते व महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना खा.सुनील तटकरे पुढे म्हणाले कि,आदिवासी समाजासाठी उत्तमप्रकारे हि वास्तू उभारण्यात आली आहे. माझ्या खासदार निधीतून ३० लाख रुपयांचा निधी या माणगाव तालुका आदिवासी भवनाला देता आले याचे मला अंतकरणापासून समाधान वाटतो आहे. जंगलचा राजा म्हणून आदिवासी समाजाची खरी ओळख आहे. हा समाज आता हळूहळू मुख्य प्रवाहात येत असून व्यसन मुक्तीच्या माध्यमातून वारकरी सांप्रदायाकडे मोठ्या संख्येने हा समाज जात आहे. शिक्षणाच्या बाबतीतही आता हा समाज सतर्क झाला असून समाजाचे बांधव - भगिनी शिक्षण घेऊन वेगवेगळ्या क्षेत्रात पुढे जात आहेत. आदिवासी समाजासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वेगवेगळ्या व्यक्तिगत लाभाच्या व महिला बचत गटासाठी योजना आहेत. या योजनांचा आदिवासी समाज बांधवानी लाभ घ्यावा त्यासाठी जे काही सहकार्य लागेल ते आम्ही सारे मंडळी करू. वनहक्क कायद्याअंतर्गत तुम्हाला मिळालेली जी जमीन आहे ती जमीन भारत व राज्य सरकारच्या माध्यमातून तुमचा खासदार या नात्याने तुमच्या नावावर केली जाईल असा शब्द खा.तटकरे यांनी आदिवासी बांधवाना देऊन जागतिक आदिवासी दिनाच्या आदिवासी बांधवाना शुभेच्छा दिल्या.

माणगाव तालुका आदिवासी समाचाचे नेते रमेश कोळी यांनी सांगितले कि,खा.तटकरे साहेब यांच्या सहकार्याने माणगावला आम्हा समाज बांधवांसाठी हि वास्तू मिळाली. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे यांनी पाठपुरावा केला. तसेच पक्षाच्या तालुक्यातील विविध पदाधिकाऱ्यांचीही त्यासाठी योग्य साथ मिळाली असे सांगत त्यांनी खा.तटकरे,मंत्री आदिती तटकरे,आ.अनिकेत तटकरे यांच्यासह पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे विशेष आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पक्षाचे तालुका सरचिटणीस राजेंद्र शिर्के यांनी केले.

## माथेरान नगरपरिषदेत १३ पैकी १० अधिकारी पदे रिक्त

**माथेरान : बातमीदार**



माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून,त्याचा थेट परिणाम येथील प्रशासनाच्या कामकाजावर आणि नागरिकांना मिळणाऱ्या मूलभूत सेवांवर होत आहे.

नगरपरिषदेच्या मंजूर १३ राज्यस्तरीय संवर्गातील पदांपैकी तब्बल १० पदे रिक्त असून,केवळ तीन अधिकारी कार्यरत असल्याने विकासकामे आणि दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर मोठा ताण निर्माण झाला आहे.या प्रश्नाची दखल घेत नगरपरिषद प्रशासनाने १३ फेब्रुवारी २०२४ रोजी नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडे रिक्त पदे भरण्याची मागणी केली होती.त्यानंतर २०२५ मधील निवडणुकीनंतर नगराध्यक्ष चंद्रकांत रमेश चौधरी यांनी ६ मार्च २०२६ रोजी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,बेलापूर यांना पुन्हा सविस्तर पत्र पाठवून तातडीने नियुया करण्याची मागणी केली.

मात्र,दोन वर्षांहून अधिक काळ सातत्याने पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.माथेरानमध्ये वर्षभर देश-विदेशातील पर्यटकांची मोठी वर्दळ असते.अशा परिस्थितीत अभियांत्रिकी, जलपुरवठा,मलनिस्सारण, निर्धारण,नगररचना,अग्निशमन आणि स्वच्छता निरीक्षक यांसारखी महत्त्वाची पदे रिक्त असल्याने विकासकामे,कर वसुली,स्वच्छता व्यवस्था तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीवर परिणाम होत आहे.त्यामुळे नागरिकांना विविध कामांसाठी वारंवार नगरपरिषदेच्या फेऱ्या माराव्या लागत असल्याने करदात्यांमध्ये नाराजी वाढत आहे.

नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी शासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन सर्व रिक्त पदांवर कायमस्वरूपी नियुया कराव्यात,अशी मागणी केली आहे. पर्यटनाच्या दृष्टीने राज्याचा मानबिंदू असलेल्या माथेरानमध्ये सक्षम प्रशासन उभे राहण्यासाठी रिक्त पदे त्वरित भरणे आवश्यक असल्याची भावना स्थानिक व्यक्त करीत आहेत.

## आज खालापुरात जागतिक आदिवासी दिवस होणार साजरा

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुका आदिवासी बांधव यांच्या वतीने संपूर्ण खालापूर तालुक्यात आदिवासी दिवस मोठ्या उत्साहात साजरा होणार असल्याची माहिती आदिवासी समितीचे अध्यक्ष मंगळ पोकळा व नेते विष्णू खैर यांनी दिली आहे.



दरवर्षी ९ ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिन म्हणून साजरा केला जातो. हा संयुक्त राष्ट्र (UN) च्या ठरावानुसार जगभरातील आदिवासी समाजाचे हक्क, त्यांची संस्कृती आणि त्यांचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी पाळला जाणारा महत्त्वाचा दिवस आहे.संयुक्त राष्ट्र महासभेने डिसेंबर १९९४ मध्ये ठराव करून ९ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय आदिवासी दिन म्हणून जाहीर केला.

१९८२ मध्ये जिनेव्हा येथे युनायटेड नेशन्सच्या मानवी हक्क आयोगाच्या स्वदेशी लोक संख्या विषयक कार्य गटाची पहिली बैठक याच दिवशी झाली होती. आदिवासी लोकांच्या जमिनी,भाषा आणि मानवी हक्कांचे रक्षण करणे.आदिवासी समाजाच्या पारंपरिक कला,भाषा, आणि जीवनशैलीचा सन्मान करणे. जल,जंगल आणि जमीन वाचवण्यासाठी आदिवासींनी दिलेल्या योगदानाची दखल घेणे.या दिवशी आदिवासी बांधव आपली पारंपरिक वेशभूषा परिधान करतात.तारपा नृत्य,ढोल आणि पारंपरिक वाद्यांच्या तालावर लोकनृत्य सादर केले जातात.विविध सांस्कृतिक कार्यक्रम, मिरवणुका आणि जनजागृती सभा आयोजित केल्या जातात.

सकाळी ९.०० वाजता मुंबई पुणे रस्त्यावर नढाळ येथील काळंबा मंदिरातून शहीद आदिवासी नेते यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून चौक मार्गे खोपोली,वावोशी आणि खालापूर अशी रथयात्रा, सायकल रॅली निघून खालापूर येथील आदिवासी भुवन समोरील भव्य मैदानात पारंपरिक नृत्य, गुणवंत यांचा सन्मान, शैक्षणिक साहित्य वाटप आणि मनोगत व्यक्त होणार असून त्या नंतर कार्यक्रमाची सांगता होणार आहे. या कार्यक्रमास रायगड जिल्हा परिषद सदस्या व समाज कल्याण समितीचे सदस्य सौ. वैशाली विष्णू खैर उपस्थित राहणार आहेत. आदिवासी बांधव यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष मंगळ पोकळा आणि सचिव दिलीप डाके यांनी केले आहे.

## तळा धरण क्षेत्रात बोटिंग सुरू करण्याच्या मागणीला जोर

**तळा : प्रतिनिधी**

तळा तहसिल कार्यालयाजवळ असणाऱ्या धरणात(पाझर तलाव) बोटींग सुविधा नगरपंचायतीच्या माध्यमातून सुरू करण्याच्या मागणीला तळावाशींयांमधून जोर चढत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

तळा तालुक्यात व परिसरात कोणत्याही प्रकारची बोटींग सेवा नसल्याने तळा शहरातील या धरणात बोटींग सेवा सुरू केली तर नगरपंचायतीचे उत्पन्न वाढण्यास मदत होऊन धरणक्षेत्र हे एक पर्यटन क्षेत्र बनून पर्यटनाला चालना मिळेल.तसेच याबोटींगमुळे १५ ते २० कर्मचार्यांना नोकरीची संधी निर्माण होऊन हॉटेल क्षेत्र वाढून उद्योग व्यवसायही वाढेल. अशाप्रकारे छोटे व्यवसाय चालू झाल्यास नागरिकांना आर्थिक लाभ होण्यास मदत होईल.


धरणक्षेत्र भाग हा ज्येष्ठ नागरिकांचे मॉर्निंग वॉकचे ठिकाण आहे.तसेच या धरण क्षेत्राच्या एका बाजूला या ठिकाणी शिवसृष्टीही निर्माण करता येईल.त्यादृष्टीने शिवसृष्टीस मंजूरी देऊन शासनाने येथे शिवसृष्टी बांधावी असीही अपेक्षा केली जात आहे.तळ्यात बोटींग सुरू झाली तर पर्यटन वाढण्यास मदत होईल.आणि हा भाग निसर्ग रम्य असा असून त्या भागात पर्यटक त्याचा आस्वाद घेतील.



## श्रीवर्धन शहर आणि परिसरात खासगी सावकारीचा धंदा तेजीत

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहर व परिसरात खाजगी सावकारीचा धंदा तेजीत असल्याचे पाहायला मिळत आहे. आर्थिक अडचणीत सापडलेले अनेक नागरिक दहा ते पंधरा टक्के व्याजाने खाजगी सावकाराकडून कर्ज घेत असल्यामुळे खाजगी सावकारी करणारे तेजी मध्ये आहेत. कर्जदार मात्र व्याज भरून भरून प्रचंड मेटाकुटीला आलेले आहेत. आज खाजगी सावकारी मुळे अनेकांच्या जमिनी देखील या सावकारांनी बळकावलेल्या आहेत. खाजगी सावकारी करणारे पैशाच्या वसुलीसाठी कोणत्याही थराला गेलेले पाहायला मिळतात. अनेक वेळा या अशा प्रकारांमुळे सावकार व कर्ज घेणारा यांच्यामध्ये अनेक वाद देखील होतात. वाद झाल्यानंतर अनेक वेळा प्रकरणे श्रीवर्धन पोलीस ठाण्याकडे देखील येतात.




परंतु व्याजी पैसे देणारा सावकार आणि घेणारा कर्जदार यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारे लेखी व्यवहार झालेला नसल्यामुळे तक्रार दाखल करून घेण्यास पोलिसांना देखील अडचण निर्माण होते. अनेक सावकार व्याजाचे पैसे मुळ रकमेपेक्षा तीन ते चार पटीने घेऊन सुद्धा मूळ रक्कम बाकी असल्याचे कर्जदाराला सांगत असतात. तर अनेक खाजगी सावकार अनेक वेळा कर्जाची रक्कम वाढवून देखील सांगत असतात. मात्र नागरिक खाजगी सावकारांकडे का जातात? हा प्रश्न देखील महत्त्वाचा आहे. शासनाच्या अनेक योजना असून या योजनांमधून विविध राष्ट्रीयकृत बँकांमधून कर्ज उपलब्ध होत असते. परंतु बँकेकडून विविध कागदपत्रांची होणारी प्रचंड मागणी यामुळे कर्ज घेणाऱ्याला मोठ्या प्रमाणात डोकेदुखी होते.

या व्यतिरिक्त एन. बी. एफ. सी. तत्त्वावरील अनेक फायनान्स कंपन्या देखील आजकाल उपलब्ध आहेत. ज्या अत्यंत कमी कागदपत्रांमध्ये कर्ज उपलब्ध करून देतात. त्याचप्रमाणे त्यांचा व्याजदर देखील परवडण्यासारखा असतो. श्रीवर्धन शहर व परिसरात सुरू असलेल्या या खाजगी सावकारी धंद्यावरती सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचेकडे ही काही कर्जदार व्यक्तींकडून तक्रार करण्यात येणार असल्याचे विश्वसनीय वृत्त प्राप्त झाले आहे. खूप मोठ्या व्याजदराने घेतलेल्या खाजगी सावकाराकडील कर्जामुळे श्रीवर्धन शहराजवळ असलेल्या एका गावामध्ये एका विवाहित तरुणाने आत्महत्या करण्याची घटना देखील घडली होती.

## चौकच्या ऐतिहासिक दगडी पुलावर चिखल, खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी

**चौक : प्रतिनिधी**

चौक या ऐतिहासिक गावातील ब्रिटीश कालीन पुलावर चिखल व खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून या खड्ड्यांमुळे गाड्यांचे नुकसान होत असताना, बंद पडलेल्या गाडीमुळे वाहतूक कोंडी होऊ लागली असल्याने संतापाची भावना निर्माण झाली आहे.

सतत पडणाऱ्या पावसात खड्डे भरण्याचा केविलवाणा प्रयत्न सार्वजनिक बांधकाम विभागाने करून बांधकाम क्षेत्रात एक नवा उच्चांक निर्माण केला आहे.खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत चौक हद्दीत मोरबे धरणाच्या धावरी नदीवर ब्रिटीश कालीन पूल आहे, प्रतिवर्षी या पुलावर खड्डे पडतात, संरक्षण कठड्याला झाडे उगवतात,याकडे सार्वजनिक बांधकाम विभागांचे लक्ष नसते. खड्डे भरण्याचा केविलवाणा प्रयत्न नेहमी केला जातो, आता जोरदार पाऊस पडत आहे त्यातच खड्डे भरून त्यावर वापरलेल्या सिमेंटच्या रिकाम्या पिशव्या टाकून पावसा पासून खड्ड्यांचे संरक्षण करण्याचा प्रयत्नही केला तोही वाया गेला.आहे.

हा ब्रिटीश कालीन पूल आहे.या पुलाची कार्यक्षमता संपली असल्याचे सांगण्यात येत असून याच्या दुरुस्ती व रुंदी करणासाठी निधी उपलब्ध झाला आहे, मात्र तो का खर्ची पडत नाही? असा वादाचा मुद्दा उपस्थित झाला आहे.ब्रिटीश दूतावास यांच्या कडून या पुलाची कार्यक्षमता संपली आहे, असे पत्र पाठवले असल्याची चर्चा सुरू आहे.





**खोपोली : भारतीय जनता पक्षाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खालापूर तालुका भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष शनी यादव यांच्या माध्यमातून देवन्हावे या ठिकाणी वृक्षारोपण व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला रायगड जिल्हा भाजप अध्यक्ष अविनाश कोळी, पंचायत समिती सभापती कृष्णाशेठ पारंगे, ज्येष्ठ नेते मनीष खवळे, भारतीय जनता पक्षाचे क्रीडा विभागाचे प्रमुख शरद कदम, देवनावे विद्यालय समिती अध्यक्ष भास्कर लांडगे व इतर भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

## मुरूड शहरात ८४वा क्रांतिदिन उत्साहात साजरा ; घोषणांनी परिसर दणाणला



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील गणेश आळी नाका परिसरातील क्रांती स्तंभ येथे मुरूड सर एस. ए. हायस्कूल व स्व. म. ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने ८४ वा क्रांती दिन ८ ऑगस्टच्या पूर्वसंध्येला मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

९ ऑगस्ट रोजी इंग्रजांनी आपल्या देशातून निघून जावे यासाठी जोरदार आंदोलन झाले व हा दिवस क्रांती दिन म्हणून साजरा होऊन चले जाओ या घोषणांनी सारा देश दणाणून सोडला होता.देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक देश भक्त शहीद झाले होते.नवीन पिढीला या बाबत माहिती व्हावी यासाठी दरवर्षी सर एस ए हायस्कूल हा कार्यक्रम उत्साहपूर्ण साजरा करीत असते.

यानिमित्ताने शाळेपासून गणेश आळी येथील क्रांती स्तंभापर्यंत प्रभातफेरी काढण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांनी 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्', 'क्रांती दिनाचा विजय असो', 'जय भवानी, जय शिवाजी' अशा घोषणांनी मुरुड शहर परिसर दणाणून सोडला.प्रभातफेरीनंतर क्रांती स्तंभाला मुरूड जंजिरा विद्या मंडळाचे संचालक प्रमोद भायदे व पांडुरंग आरेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सर्वांनी राष्ट्रगीत सादर करण्यात आले.या कार्यक्रमाला मुरुड जंजिरा विद्या मंडळाचे संचालक पांडुरंग आरेकर, प्रमोद भायदे, मुख्याध्यापक सरोज राणे, पर्यवेक्षक भास्कर मोरे, पी.टी. शिक्षक बालाजी घुगे, महेंद्र घाटवळ, डी.टी. शिंदे, तोडले सर, सीमा तांबडकर यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पांडुरंग आरेकर यांनी क्रांती दिनाचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, ९ ऑगस्ट १९४२ हा दिवस पारतंत्र्याच्या विरोधातील निर्णायक लढ्याचा महत्त्वपूर्ण टप्पा ठरला. १८५७च्या उठावातून स्वराज्याच्या क्रांतीची बीजे रोवली गेली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी हजारो देशभक्तांनी बलिदान दिले, तर अनेकांचे तारुण्य तुरुंगात गेले. महात्मा गांधी यांनी अहिंसा आणि प्रखर देशभक्तीची सांगड घालत स्वातंत्र्यलढ्याला व्यापक स्वरूप दिले. त्यामुळे संपूर्ण देश स्वातंत्र्याच्या लढ्यात उतरला आणि अखेर इंग्रजांना भारताला स्वातंत्र्य देणे अपरिहार्य ठरले.स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण प्रत्येकाने जपली पाहिजे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी प्रत्येकाने क्रांती स्तंभाला भेट देऊन नतमस्तक व्हावे, असे आवाहनही पांडुरंग आरेकर यांनी केले.


# महारोजगार मेळावा

































दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com